## वृषाली जोशी

# अपमानित नोकर



# अपमानित नोकर

मूळ लेखिका – अगाथा ख्रिस्ती

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# अपमानित नोकर

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

**आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.**

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अपमानित नोकर

लेखिका : अगाथा ख्रिस्ती

अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१९७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १२ मे २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अगाथा ख्रिस्ती



अगाथा ख्रिस्ती ही जगातील पुस्तक खपाचा उच्चांक गाठलेली व जिच्या लिखाणावर आधारित असे अनेक नाटक व सिनेमे निघाले, अशी प्रसिद्ध इंग्लिश लेखिका होती. सुमारे शंभर भाषांमध्ये तिच्या पुस्तकांचे अनुवाद झाले.

पहिल्या महायुद्धात ती परिचारिका म्हणून काम करत होती. तिची पहिली कादंबरी ‘The Mysterious Affair of Styles’ ही १९२० मध्ये प्रकाशित झाली. त्यात तिने हर्क्युल पायरो या गुप्तहेराची निर्मिती केली. पुढे २५ कादंबऱ्यांमध्ये तेच पात्र रहस्ये सोडवत राहिले. ‘The Murder of Roger Ackroyd’ या १९२६ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीपासून

मिस जेन मार्पल ही स्त्री गुप्तहेर पुढे आली व त्यापुढील ७५ कादंबऱ्यांमध्ये तीच रहस्ये सोडवत राहिली. Mousetrap [१९५२] हे तिचे नाटक पहिल्यांदा एका थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २१ वर्षे चालले व त्याचे ८८६२ प्रयोग झाले. तर दुसऱ्या थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २०२० सालापर्यंत चालू होते व त्याचे २८००० प्रयोग झाले. 'And then There Were None' यावर आधारित हिंदी सिनेमा 'गुमनाम' तुम्हाला नक्कीच माहिती असेल.

१९२० मध्ये आर्चिबाल्ड ख्रिस्ती या तिच्या नवऱ्याने घटस्फोट मागितला. तेव्हा ती नाहीशी झाली. यथावकाश ती सापडली व तिने १९३० मध्ये पुरातत्वशास्त्रज्ञ सर मॅक्स मॅलोवनशी लग्न केले. तिने अद्भुतरम्य कादंबऱ्याही लिहिल्या. उदाहरणार्थ, Absent in the Spring ही १९४४ मध्ये लिहिलेली कादंबरी.

तिच्या THE UNDER DOG या कादंबरीचा अनुवाद प्रस्तुत पुस्तकात केला आहे.

THE UNDER DOG

# अपमानित नोकर



लिली मार्ग्रेव्हने तिचे मोजे उदासीनतेने तिच्या गुडघ्यावर घासले. आणि मोठ्या खुर्चीत तिच्यासमोर बसलेल्या व्यक्तीकडे नजर टाकली.

प्रसिद्ध शोधक हर्क्युल पायरोबद्दल तिने ऐकले होते. पण त्याला प्रत्यक्ष भेटण्याची ही पहिलीच वेळ होती. त्याने दाखवलेल्या विचित्र/ विनोदी पद्धतीमुळे, तिचे त्याच्याबद्दलचे मत फारसे अनुकूल झाले नाही. हा अंड्याच्या आकाराचे डोके असलेला, मोठ्या मिशा असलेला मजेशीर

छोटा माणूस, खरेच नवलपूर्ण गोष्टी करतो का? या क्षणी तिला त्याचा व्यवसाय पोरकट वाटला. तो लोकरीचे रंगीत गठ्ठे एकमेकांवर ठेवत होता. ती जे सांगत होती, त्यापेक्षा असे करून काय होते, यात त्याला जास्त रुची असल्याचे वाटत होते.

मात्र ती अचानक थांबल्यावर त्याने तिच्याकडे निरखून पाहिले. "बाईसाहेब, मी तुम्हाला सांगत रहाण्याची विनंती करतो. माझे लक्ष नाही, असे नाही. मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो, माझे अचूक लक्ष आहे."

त्याने परत लोकरीचे रंगीत गठ्ठे एकमेकांवर ठेवायला सुरवात केली. त्या मुलीने परत सांगायला सुरवात केली. ती वाईट, भीतीदायक गोष्ट होती. त्यात आक्रमकता असून, ती शोकांतिका होती. पण तिचा आवाज इतका शांत व थंड होता व कथन इतके त्रोटक पण माहितीपूर्ण होते, की त्यात माणुसकीचा लवलेशही उरला नव्हता.

शेवटी ती थांबली.

ती उत्सुकतेने म्हणाली, "तर अशा रीतीने मी सर्व काही स्पष्ट केले आहे."

पायरोने पुष्कळ वेळा जोराने त्याची मान हलवली. मग त्याने लोकरीच्या गठ्ठ्यांवरून हात फिरवला व ते टेबलावर पसरून टाकले. खुर्चीत मागे टेकत, त्याने बोटांची टोके एकत्रितपणे छताकडे लागलेल्या डोळ्यांवर दाबून धरली. तो तिच्या कथनाची उजळणी करू लागला.

सर रुबेनचा दहा दिवसांपूर्वी खून झाला होता. परवाच्या बुधवारी, त्याचा पुतण्या, चार्ल्स लिव्हरसन याला पोलिसांनी अटक केली. त्याच्याविरुद्धचे मुद्दे तुम्हाला माहिती असल्याप्रमाणे, असे आहेतः

बाईसाहेब, मी काही चुकलो तर मला सांगा. सर रुबेन रात्री उशीरा त्याच्या खासगी जागी, मनोऱ्याच्या खोलीत लिहित बसले होते. मिस्टर लिव्हरसन उशीरा तेथील बरोबर काकांच्या खाली असलेल्या खोलीत स्वतःच्या किल्लीने दार उघडून आत आले. स्वयंपाक्याने त्याना त्यांच्या काकांशी उच्च रवात भांडतांना ऐकले. खुर्ची फेकल्याचा जोरदार आवाज व गळा आवळल्याचे श्वास अडकल्यासारखे रडणे, याबरोबर भांडण थांबल्यासारखे वाटले.

स्वयंपाकी सावध झाला व वर जाऊन काय झाले आहे, हे बघायचा विचार करू लागला. पण जरा वेळाने त्याने मिस्टर लिव्हरसनना आनंदाने शीळ वाजवत खोलीबाहेर पडतांना पाहिले. मग त्याने फारसा विचार केला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी, नोकराणीला शोध लागला, की सर रुबेन त्यांच्या टेबलाशी मरून पडले आहेत. त्याना कुठल्यातरी जड वस्तूने खाली ढकलण्यात आले होते. मला वाटते, स्वयंपाक्याने त्याला माहिती असलेली हकीगत प्रथम पोलिसांना सांगितली नाही. पण बाईसाहेब, ते साहजिक झाले असावे, नाही का?"

अचानक आलेल्या प्रश्नाने, लिली मार्ग्रेव्ह चमकली. ती म्हणाली, 'काय बोललात?"

छोटा मनुष्य म्हणाला, "असल्या बाबतीत एखादा मानवतेच्या वागणुकीची अपेक्षा करतो, नाही का? तुम्ही मला गोष्ट सांगितली --- इतक्या कौतुकाने, इतक्या नेमकेपणे --- तुम्ही अभिनयाच्या मशीनमधून नटांच्या बाहुल्या बाहेर काढल्यात. पण मी नेहमी मानवी स्वभावाकडे बघतो. मी मला म्हणतो, हा स्वयंपाकी, तुम्ही त्याचे नाव काय म्हणालात?"

“त्याचे नाव पार्सन्स आहे.”

“हा पार्सन्स, याच्याकडे या दर्जाची स्वभाववैशिष्ट्ये असतील. तो पोलिसांना जोरदारपणे विरोध करेल. तो त्यांना शक्यतो अगदी कमीत कमी माहिती देईल. सर्वात कडी म्हणजे, घरच्या कुणा सभासदावर घरफोड्या, चोरी असले काही आळ येतील, असे तो काही सांगणार नाही. तो त्या कल्पनेला हट्टीपणाने, सर्व जोर लावून चिकटून राहील. हो, नोकरवर्गाच्या इमानदारीचा विषय हा अभ्यासाचा रुचीपूर्ण विषय आहे.”

तो मागे टेकला.

त्याने चालू ठेवले, “मधल्या काळात, घरातील प्रत्येकाने त्याची / तिची गोष्ट सांगितली होती. उरलेल्यांपैकी मिस्टर लिव्हरसनची गोष्ट अशी होती, की तो उशीरा आला व आणि काकांना न भेटताच झोपायला गेला.”

“तो असे बोलला.”

पायरोने विचार केला, “पार्सन्स सोडून कुणीही त्यावर अविश्वास दाखवला नाही. मग तिथे स्कॉटलंड यार्डचा इन्स्पेक्टर आला. तुम्ही इन्स्पेक्टर मिलर म्हणालात, नाही का? मला तो माहिती आहे. मी पूर्वी एकदोन वेळा त्याच्याबरोबर काम केले आहे. तो चिकाटीने शोध घेणारा, चटपटीत लबाड कोल्हा आहे.

“हो, मला तो माहिती आहे. तो हुशार आहे. स्थानिक पोलिसांना जे दिसत नाही, ते तो बघू शकतो. तो पार्सन्स थोडा आजारी व अस्वस्थ आहे. त्याने न सांगितलेले, असे काही त्याला माहिती आहे. ठीक आहे, त्याने पार्सन्सचा थोडासा अभ्यास केला आहे. आतापर्यंत एवढे स्पष्टपणे सिद्ध झाले आहे, की त्या रात्री घरी कुणी आले नव्हते. खुन्याला बाहेर नव्हे, तर

घरातच शोधायला पाहिजे. पार्सन्स दुःखी व घाबरलेला आहे. पण गुप्त माहिती त्याच्याकडून सांगितली गेल्यामुळे, त्याला सुटका झाल्यासारखे वाटते आहे.

"काही प्रकरण होणे टाळण्यासाठी, त्याने जास्तीत जास्त प्रयत्न केले आहेत. त्यामुळे इन्स्पेक्टर मिलरने त्याची गोष्ट पूर्णपणे ऐकून घेतली आहे. एकदोन प्रश्न विचारले आहेत. आणि मग त्याचा तपास खासगी रीत्या केला आहे. त्याने बांधत आणलेली केस खूप बळकट आहे --- खूप बळकट.

मनोऱ्याच्या खोलीत कोपऱ्यातील कपाटावर, चार्ल्स लिव्हरसनच्या बोटांचे ठसे सापडतात. नोकराणी सांगते, की गुन्हा घडल्यानंतरच्या सकाळी तिने मिस्टर लिव्हरसनच्या खोलीतील रक्ताच्या पाण्याचे बेसिन स्वच्छ केले. त्याने तिला स्पष्ट केले, की त्याचे बोट कापले गेल्यामुळे असे झाले. आणि हो, त्याच्या बोटाला लहानशी जखम होती. रक्ताचे डाग पडलेल्या त्याच्या शर्टाच्या बाहीचा शेवटचा भाग धुण्यात आला. त्याच्या कोटाच्या हातावरही रक्ताचे डाग होते .त्याच्याकडे पैशांची वानवा होती. पण सर रुबेनच्या खुनानंतर त्याला वारसाहक्काने बऱ्यापैकी पैसे मिळाले. बाईसाहेब, ही फार बळकट केस आहे." तो थांबला.

"आणि तरीही तुम्ही आज माझ्याकडे आलात."

लिली मार्ग्रेव्हने तिचे नाजूक खांदे शहारवले.

"मिस्टर पायरो, मी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे, मला ॲस्टवेल बाईसाहेबांनी पाठवले आहे."

त्या छोट्या माणसाने तिच्याकडे गर्विष्ठपणे पहात म्हटले. "तुम्ही स्वतःहून आला नसतात का?" मुलीने काही उत्तर दिले नाही.

“तुम्ही माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही.”

लिली मार्ग्रेव्हने परत तिचे मोजे घासायला सुरवात केली. “हे माझ्यासाठी कठीण आहे. मिस्टर पायरो, मी ॲस्टवेल बाईसाहेबांशी एकनिष्ठ आहे. खरे पहाता, मी तिची फक्त पगारावर नेमलेली सहकारी आहे. पण तिने मला तिच्या मुलीसारखे वा पुतणीसारखे वागवले आहे. ती असामान्यपणे दयाळू आहे. तिचे काही दोष असले, तरी त्यावर टीका करायला किंवा --- या केसमध्ये तुमचे मत तिच्याबद्दल कलुषित करायला, मला आवडत नाही.”

त्या छोट्या माणसाने आनंदाने जाहीर केले, “ हर्क्युल पायरोचा पूर्वग्रह बदलणे अशक्य आहे. तुम्हाला असे वाटते, की ॲस्टवेल बाईसाहेबांच्या टोपीखाली गुणगुणणारी मधमाशी आहे, काय, बरोबर ना?”

“जर मला बोलायचेच असेल --- “

“बोला, बाईसाहेब.”

“मला वाटते ही सर्व गोष्ट मूर्खपणाची आहे.”

“तुम्हाला असे वाटते, तर?”

“मला ॲस्टवेल बाईसाहेबांच्या विरुद्ध काही बोलायचे नाही --- “

पायरो हळू पुटपुटला, “मी जाणू शकतो. मी पूर्णपणे जाणू शकतो.” त्याने डोळ्यांनी तिला पुढे बोलायला सांगितले.

“ती खरेच खूप चांगली आहे. घाबरायला होईल, इतकी दयाळु आहे. मी हे कसे सांगू? ती काही शिकलेली बाई नाही. तुम्हाला माहिती आहे, जेव्हा सर रुबेनने तिच्याशी लग्न केले, तेव्हा ती अभिनेत्री होती. तिच्याकडे सर्वांबद्दल पूर्वग्रह आणि अंधश्रद्धा होत्या. ती म्हणेल, ती पूर्व

दिशा, असे होते. ती तार्किक दृष्ट्या काही समजून घेत नसे. इन्स्पेक्टर तिच्याशी फारशा युक्तीने वागला नाही. त्यामुळे ती चिडली. ती म्हणते मिस्टर लिव्हरसनना दोषी ठरवून संशय घेणे, बरोबर नाही. पोलीस ती चूक करतील. पण मिस्टर चार्ल्सने खून केला नाही.”

“पण त्यामागील तार्किकता ती सांगत नाही?”

“काहीच नाही.”

“असे आहे काय? तर मग आता, खरे तर काय करावे?”

लिली म्हणाली, “मी तिला सांगितले, की असे नुसते विधान करणे चूक आहे. त्याला पुरावा पाहिजे.”

पायरो म्हणाला, “तुम्ही तिला हे सांगितले. खरेच सांगितले का? हे नवलपूर्ण आहे.” त्याने लिलीवर झटपट नजर फिरवून तिचे आकलनात्मक सर्वेक्षण केले. तिचा काळा सूट, गळ्याचा पांढरा हलकासा रंग, छोटीशी चटपटीत काळी टोपी, तिचा डौलदारपणा, सुंदर चेहरा, छोटीशी टोकदार हनुवटी आणि गडद निळे लांब पापण्यांचे डोळे हे सर्व पाहिले. नकळत त्याचा दृष्टीकोन बदलला. तो आता केसमध्ये जेवढी रुची घेत नव्हता, तेवढी समोर बसलेल्या मुलीत घेऊ लागला.

बाईसाहेब, माझ्या कल्पनेप्रमाणे, ॲस्टवेल बाई थोडी अस्थिर व झटके येणारी असून, ती फारशी महत्वाची नाही, नाही का?”

लीलीने लगेच मान हलवली. “हे तिचे बरोबर वर्णन आहे. मी सांगितल्याप्रमाणे ती दयाळु आहे पण तिला तार्किक दृष्ट्या गोष्टी पटवून देणे आणि तिच्याबरोबर वाद घालणे अशक्य आहे.”

पायरोने सुचवले, “तिच्या मते तिचा कोणावर तरी संशय असावा. कोणीतरी अगदी फालतू माणूस!”

लिली ओरडली, “ती अगदी असेच करते. तिला सर रुबेनचा सचिव अजिबात आवडत नव्हता. बिचारा! ती म्हणते, तिला माहिती आहे, की त्यानेच हे केले आहे. तरीही अशी गोष्ट निष्कर्षाने सिद्ध झाली आहे, की त्या बिचाऱ्या ओवेन ट्रेफ्युसिसने ते केले नसावे.”

“आणि ती ते कसे, ते काहीच सांगत नाही?”

“अर्थातच नाही. ते आपले तिला वाटते, एवढेच.” लिलीचा आवाज चेष्टेखोर व रागावलेला होता.

पायरो हसत बोलला, “बाईसाहेब, तुम्ही एखाद्याला असे वाटते, यावर विश्वास ठेवत नाही का?”

लिली उत्तरली, “मला तो मूर्खपणा वाटतो.”

तो त्याच्या खुर्चीत रेलून पुटपुटला, “ॲस्टवेलसारख्या कमी बायकांना असे वाटते, की देवाने त्यांना हे विशेष शस्त्र दिले आहे व त्यानुसार त्याना इतरांपेक्षा नऊ पटीने सत्य जास्त उमगते.”

लिली म्हणाली, “मला माहिती आहे. पण ॲस्टवेल बाईसाहेब कशा आहेत, ते मी तुम्हाला सांगितले. तुम्ही तिच्याबरोबर अजिबात वाद घालू शकत नाही.”

“तर मग बाईसाहेब, तुम्ही शहाण्या आणि काळजी घेणाऱ्या असल्यामुळे, तुम्ही माझ्याकडे आलात आणि मला एकंदर परिस्थितीची जाणीव करून दिलीत.”

या आवाजाच्या पोताने त्या मुलीला पायरोकडे निरखून बघायला लावले.

लिली क्षमा मागायच्या सुरात बोलली, “तुमचा वेळ किती महत्वाचा आहे, हे अर्थात मला माहिती होते.”

पायरो म्हणाला, “तुम्ही दुसऱ्याला फारच खूष करता. पण खरे तर --- हो, हे खरे आहे, आता यावेळी माझ्याकडे बऱ्याच केसेस आहेत.”

लिली उठत म्हणाली, “असे असेल, अशी भीती मला होतीच. मी ॲस्टवेल बाईसाहेबांना सांगते --- “

पण पायरो उठला नाही. त्याऐवजी तो खुर्चीत अजून मागे रेलून बसला आणि मुलीकडे स्थिर नजरेने बघू लागला. “बाईसाहेब, तुम्हाला जायची घाई आहे का? मी तुम्हाला विनंती करतो अजून जरा वेळ बसा.”

तिच्या चेहऱ्यावर रंग पसरला व गेला. ती मनात नसल्यासारखी सावकाश बसली.

पायरो म्हणाला, “बाईसाहेब झटपट आणि फसव्या आहेत. माझ्या सारख्या म्हाताऱ्याला निर्णय घ्यायला वेळ लागतो, तो तिने मला द्यायला हवा. तुम्ही माझ्याबद्दल गैरसमज करून घेतलात. मी ॲस्टवेल बाईसाहेबांकडे जात नाही, असे मी म्हटले नाही.”

“तुम्ही याल तर मग?”

मुलीचा स्वर सपाट होता. तिने पायरोकडे पाहिले नाही. ती जमिनीकडे बघत होती. त्याने ज्याप्रकारे तिची निवड केली होती, त्याबद्दल ती अनभिज्ञ होती.

“बाईसाहेब, ॲस्टवेल बाईसाहेबांना सांगा की मी त्यांचे काम करायला तयार आहे. मी आज दुपारी --- मॉन रीपोसला येतो.”

तो उठला. मुलगी त्याच्या मागोमाग गेली. “मी त्यांना सांगते. मिस्टर पायरो, तुम्ही येत आहात, हे चांगले आहे. तरी मला भीती आहे की तुम्हाला गुंतागुंतीच्या, लांबलचक कामाला लावले आहे, असे तुम्हाला वाटेल.”

“असे असेलही, पण कोणाला माहिती?”

त्याने तिला पद्धतशीरपणे दारापर्यंत सोडले. मग तो विचारात बुडून जात, भुवया उंचावत, हॉलमध्ये परतला. एकदोनदा त्याने डोके हलवले व दार उघडून त्याच्या नोकराला बोलावले. “जॉर्ज, माझी बॅग भर. मी आज दुपारी गावाला जाणार आहे.”

जॉर्ज बोलला, “ठीक आहे, सर.” तो अगदी इंग्लिश दिसणारा, उंच, अशक्त आणि भावना नसलेला माणूस होता.

हाताच्या खुर्चीत बसून, सिगरेट पेटवत पायरो म्हणाला, “जॉर्ज, तरूण मुलगी हे एक वेगळेच प्रकरण असते. विशेषतः तिचे डोके तल्लख असेल तर मग काय, तुला समजेल. एखाद्याला एखादी गोष्ट करायला सांगणे आणि त्याच वेळी त्याला ती न करायलाही प्रवृत्त करणे, हे नाजूक काम आहे. त्यासाठी हुशारी लागते. ती हुशार आणि कसबी आहे --- ओहो, फारच हुशार आहे --- पण हर्क्युल पायरो, बरका जॉर्ज, असामान्य हुशारी असलेला आहे.”

“सर, मी तुम्हाला असे म्हटलेले ऐकले आहे.”

पायरो विचारपूर्वक म्हणाला, “तिच्या मनात सचिव नाही. ॲस्टवेल त्याला शिव्या देते व कःपदार्थ समजते. तसेच कोणीही या समस्येकडे दुर्लक्ष

करू नये म्हणून ती जागरूक असते. पण जॉर्ज, मी तिकडे जाऊन त्यांना त्रास देतो. मी तिथे जाऊन वाद घालतो. तिथे थिएटरमध्ये नाटक लागले आहे. माणसांचे नाटक. आणि त्याने मी उद्दिपित होतो. ती छोटीशी मुलगी हुशार होती. पण तेवढे पुरेसे नाही आहे. मला तिथे काय सापडेल, याचे मला नवल वाटते.''

एक नाटकी विसावा घेत पायरो थांबला. क्षमायाचनेच्या सुरात जॉर्ज म्हणाला, ''सर, तुमचे कपडेदेखील बॅगेत भरू का?''

पायरोने त्याच्याकडे दुःखाने बघितले. ''जॉर्ज, तू नेहमी तुझ्या कामात पूर्णपणे लक्ष देतोस. तू आहेस, म्हणून मला बरे आहे.''

जेव्हा ४.५५ ला ॲबॉट्स क्रॉस स्टेशनला गाडी थांबली, तेव्हा त्यातून व्यवस्थित कपडे केलेला, पोमेड लावून मिशा वळणदार केलेला मिस्टर हर्क्युल पायरो उतरला. त्याने त्याचे तिकीट दिले. तो चालतांना त्याला एका उंच गाडीचालकाने हटकले.

''मिस्टर पायरो?''

छोटा मनुष्य त्याच्याकडे वळला. ''ते माझे नाव आहे.''

''सर, कृपया, इकडून चला.''

त्याने मोठ्या रोल्स रॉयसचे दार उघडून धरले. तिथून तीन मिनिटावर घर होते. चालकाने उतरून दार उघडले. पायरो बाहेर आला. स्वयंपाक्याने आधीच दार उघडून धरले होते.

पायरोने घरात शिरण्यापूर्वी, घराबाहेरील दृष्यावर नजर फिरवली. ते लाल विटांमध्ये बांधलेले, मोठे, दणकट घर होते. सौदर्याची फारशी काळजी न करता, दणकट व आरामशीर पद्धतीने बांधले घर होते.

पायरो हॉलमध्ये शिरला. स्वयंपाक्याने त्याला कोट व टोपी काढायला मदत केली. नंतर चांगला नोकर असल्याप्रमाणे, त्याने अगत्याने मान देत काही पुटपुट केली. "सर, मालकीणबाई तुमची वाट बघत आहेत."

पायरो मऊ गालिचा घातलेल्या जिन्याने त्याच्या मागे गेला. पार्सन्स संशयातीतपणे चांगले प्रशिक्षण घेतलेला, भावना प्रदर्शनापासून दूर असलेला नोकर होता. जिना चढल्यावर तो उजव्या बाजूला वळला व पॅसेजमधून जात, प्रतीक्षालयात आला. तिथे दोन दारे होती. डावीकडील दार उघडून, तो म्हणाला, "बाईसाहेब, मी मिस्टर पायरो."

खोली फार मोठी नव्हती. तिथे फर्निचरची व नक्षीदार वस्तूंची दाटी होती. काळे कपडे घातलेली एक बाई सोफ्यावरून उठली आणि पायरोकडे चालत आली.

हात पुढे करत, ती म्हणाली, "मिस्टर पायरो" झरझर तिचे डोळे त्या नीटनेटक्या छोट्या माणसावरून फिरले. पायरोच्या वाकण्याकडे व "बाईसाहेब" अशा बोलण्याकडे दुर्लक्ष करत मिनिटभर ती थांबली. एका झटक्यात त्याचा हात सोडून, ती उद्गारली, "मी छोट्या माणसांवर विश्वास टाकते. ते हुशार असतात."

पायरो पुटपुटला, "इन्स्पेक्टर मिलर मला वाटते, उंच माणूस आहे?"

"स्वतःबद्दल जादा अभिमान असणारा तो एक मूर्ख माणूस आहे. मिस्टर पायरो, इथे माझ्याशेजारी बसाल का?" तिने सोफ्याकडे बोट दाखवले.

"लीलीने मला तुम्हाला बोलावण्यापासून दूर ठेवले. पण आयुष्यात पहिल्यांदाच, मला माझे मन कळत नाही आहे."

पायरो तिच्याजवळ बसत म्हणाला, “असे क्वचितच होते.”

ॲस्टवेल बाईसाहेब उशांमध्ये आरामशीर बसल्या आणि पायरोकडे वळल्या. “लिली चांगली मुलगी आहे. पण तिला वाटते, तिला सगळे माहिती आहे. आणि माझ्या अनुभवाप्रमाणे, अशा तऱ्हेचे लोक चुकत असतात. मिस्टर पायरो, मी काही हुशार नाही. कधीच नव्हते. पण जिथे अनेक मूर्ख असतात काही चुकीचे वागत असतात, तिथे मी बरोबर असते. मी मार्गदर्शनावर विश्वास ठेवते. कोण खुनी आहे, ते मी तुम्हाला सांगू का, की नको? मिस्टर पायरो, एका बाईला ते माहिती आहे.”

“मिस मार्ग्रेव्हला माहिती आहे का?”

ॲस्टवेल बाईसाहेबांनी कडकपणे विचारले, “तिने तुम्हाला काय सांगितले?”

“तिने मला केसचे मुद्दे सांगितले.”

स्वतःचा हेका चालवत, त्याच्यावर सहजपणे वाकत ती बोलली, “मुद्दे? ओहो, अर्थात ते चार्ल्सच्या विरूद्ध ठाम आहेत. पण मी तुम्हाला सांगते, मिस्टर पायरो, त्याने ते केलेले नाही. मला माहिती आहे, त्याने ते केलेले नाही.”

ॲस्टवेल बाईसाहेब, तुम्ही फार सकारात्मक आहात.”

“माझ्या नवऱ्याला ट्रेफुसीसने मारले. मिस्टर पायरो, याबद्दल मला खात्री आहे.”

“का?”

“म्हणजे त्याने का मारले असे तुम्हाला म्हणायचे आहे, की माझी तशी खात्री का आहे? मी सांगते ते, मला माहिती आहे! मी त्या गोष्टींबद्दल

विनोदी आहे, असे तुम्हाला वाटेल, पण माझ्या मनाने ते ठरवून टाकले व मग मी त्याला चिकटून राहिले."

"सर रुबेनच्या मृत्यूमुळे मिस्टर ट्रेफुसीसचा काय फायदा होणार होता?"

ॲस्टवेल बाईसाहेब लगेच उत्तरल्या, "एक पेनीसुद्धा मिळणार नव्हती. यावरून तुमच्या लक्षात येईल, की प्रिय रुबेनला तो आवडत नव्हता व त्याच्यावर रुबेनचा विश्वासही नव्हता."

"तो सर रुबेनबरोबर खूप काळ होता का?"

"जवळजवळ नऊ वर्षे."

"एखाद्या माणसाच्या नोकरीसाठी, हा मोठा काळ आहे. हो, मिस्टर ट्रेफुसीस त्यांच्या मालकाला चांगले ओळखत असतील."

ॲस्टवेल बाईसाहेब त्याच्याकडे रोखून बघत राहिल्या. "तुम्हाला काय म्हणायचे आहे? त्याचा या खुनाशी काय संबंध आहे?"

पायरो म्हणाला, "मी माझी एक लहानशी कल्पना आजमावून बघत होतो. नोकरीच्या परिणामांची, फार रुचीपूर्ण नसलेली पण मूळ अभिनव कल्पना!"

ॲस्टवेल बाईसाहेब त्याच्याकडे अजूनही रोखून बघत राहिल्या होत्या. जरा संशयाने ती बोलली, "प्रत्येकजण म्हणतो, तुम्ही फार हुशार आहात, नाही का?"

पायरो हसला.

"बाईसाहेब, येणाऱ्या दिवसात कदाचित तुम्ही माझ्यावर असा शेरा माराल. पण आपण आपल्या कामाकडे वळू. हा हादसा झाला, तेव्हा घरात कोणकोण लोक होते, ते मला सांगा."

"अर्थात चार्ल्स होता."

मला कळल्याप्रमाणे तो तुमच्या नवऱ्याचा भाचा होता."

"हो. तो रुबेनच्या बहिणीचा एकुलता एक मुलगा होता. तिने तुलनेने एका श्रीमंत माणसाशी लग्न केले होते. पण गावात एका अपघातात तो व त्याची बायको मेले. त्यावेळेस मुलगा तेवीस वर्षांचा होता. मग चार्ल्स आमच्याकडे रहायला आला. तो वकील होणार होता. पण त्यावेळी रुबेनने त्याला स्वतःच्या कार्यालयात घेतले."

"मिस्टर चार्ल्स उद्योगी होता का?"

ॲस्टवेल बाईसाहेब मान हलवून पसंती देत, म्हणाली, "स्वतः होऊन कामात रुची घेऊन, ते तडफदारपणे पार पाडणारी माणसे मला आवडतात. नाही, तोच त्रास असतो. चार्ल्स उद्योगी नव्हता. तो नेहमी कामात काहीतरी गोंधळ करे. काकांशी त्याचे नेहमी वादविवाद चालत. गरीब बिचाऱ्या रुबेनबरोबर जमवून घेणे सोपे नव्हते. मी त्याला खूप वेळा सांगितले, की तो तरूण असतानाची गोष्ट तो विसरला होता. मिस्टर पायरो, त्या दिवसात, तो फार वेगळा होता."

ॲस्टवेल बाईसाहेबांनी पूर्वीच्या गोष्टी आठवून, एक सुस्कारा टाकला.

पायरो बोलला, "बाईसाहेब, बदल यायलाच हवेत. तसा नियमच आहे."

अ‍ॅस्टवेल बाईसाहेब बोलल्या, “तरीही, तो माझ्याशी उद्धटपणे वागत नसे. आणि कधी जर वागला तर नंतर माफी मागत असे --- बिचारा प्रिय रुबेन.”

रुबेन जरा कठीण होता का?”

अ‍ॅस्टवेल बाईसाहेब बोलल्या, “एखाद्या सिंहाला यशस्वीपणे प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकाप्रमाणे, मी त्याला नेहमी बरोबर हाताळत असे. पण जेव्हा त्याचा रागाचा पारा चढून, तो नोकरांवर ओरडे, तेव्हा थोडी विचित्र परिस्थिती निर्माण होत असे. असे न करता काम करवून घेण्याचे मार्ग होते. रुबेनचे वागणे चुकीचे होते.”

”अ‍ॅस्टवेल बाईसाहेब, रुबेनने त्याच्या पैशांची काय व्यवस्था केली होती?”

अ‍ॅस्टवेल बाईसाहेब लगेच उत्तरल्या, “अर्धी मला आणि अर्धी चार्ल्सला. वकीलाने ते इतक्या साध्या पद्धतीने लिहिलेले नाही, पण त्याचा मतितार्थ तोच!”

पायरोने डोके हलवले. तो पुटपुटला, “अस्स ---अस्स. आता तुम्ही घरातील माणसांबद्दल सांगावे. तुम्ही, मिस्टर रुबेन आणि त्यांचा भाचा, मिस्टर चार्ल्स लिव्हरसन, सचिव, मिस्टर ओवेन ट्रेफुसीस आणि नोकराणी लिली मार्ग्रेव्ह. तुम्ही लिलीबद्दल मला अधिक माहिती द्या.”

“तुम्हाला लिलीबद्दल जाणून घ्यायचे आहे का?”

“ती तुमच्याकडे खूप काळ आहे का?”

“सुमारे एक वर्ष. माझ्याकडे खूप सचिव व सहकारी होते. पण कसे कुणास ठाऊक, माझे त्यांच्याशी पटत नसे. पण लिली वेगळी आहे. तिचे

व्यवहारज्ञान चांगले असून, ती हुशार आहे. दिसायलाही चांगली आहे. मला माझ्याबरोबर चांगल्या चेहऱ्याची माणसे असलेली आवडतात. मिस्टर पायरो, मी विनोदी प्रकारची बाई आहे. मी माझी आवड वा नावड स्पष्टपणे सांगून टाकते. या मुलीला पाहिल्याबरोबर मी म्हटले, “ही चालेल.”

ती तुमच्याकडे मैत्रिणीमार्फत आली का?”

“मला वाटते, ती जाहिरातीला उत्तर म्हणून आली. हो --- बरोबर.”

“तिच्या घरच्यांबद्दल तुम्हाला काही माहिती आहे का?”

“मला वाटते, तिचे आईवडील भारताबाहेर आहेत. मला त्यांच्याबद्दल फारसे माहिती नाही. पण लीलीकडे दृष्टीक्षेप टाकल्यावर तुम्हालाही जाणवेल, की ती चांगली मुलगी आहे, नाही का?”

“हो, अगदी बरोबर.”

ॲस्टवेल बाईसाहेब पुढे बोलल्या, “अर्थात, मी फार पद्धती पाळणारी, चांगली बाई नाही, हे मला माहिती आहे. पण मी मनाने वाईट नाही. मला एखादी गोष्ट आवडल्यास, मी तिची वाखाणणी करू शकते. लिली माझ्याशी खूप चांगली वागते. मी तिच्याकडे खरेच, माझी मुलगी म्हणूनच बघते.”

पायरोने त्याचा उजवा हात पसरला आणि टेबलावर त्याच्याजवळ पडलेल्या वस्तु त्याने सरळ केल्या.

“सर रुबेन तुमच्याजवळ मन मोकळे करत असत का?”

त्याचे डोळे काही फुटकळ वस्तूंकडे लागले असले, तरी ॲस्टवेल बाईसाहेबांना उत्तर द्यायला लागलेला वेळ त्याच्या लक्षात आला.

“पुरुषांच्या बाबतीत ते जरा अवघड असते. पण अर्थात आमचे एकमेकांशी चांगले सख्य होते.”

पायरो हसत म्हणाला, “आभारी आहे.”

त्याने विचारले, “घरात, नोकर सोडून, एवढेच लोक होते?”

“व्हिक्टर होता.”

“व्हिक्टर?”

“हो, माझ्या नवऱ्याचा भाऊ, आणि त्याचा भागीदार.”

“तो तुमच्याबरोबर रहात असे?”

“नाही, तो नुकताच भेटायला आला होता. गेली काही वर्षे तो पश्चिम आफ्रिकेत होता.”

पायरो पुटपुटला, “पश्चिम आफ्रिका!” त्याच्या लक्षात आले, की ॲस्टवेल बाईसाहेबांना भरपूर वेळ दिला, तर त्यांच्याकडून एखाद्या विषयाबद्दल विश्वसनीय माहिती मिळे.

“ते म्हणतात, की तो नवलपूर्ण देश आहे. पण माझ्या मते अशा जागेचा माणसावर वाईट परिणाम होतो. ते फार पिऊ लागून मर्यादा सोडतात. कोणत्याच ॲस्टवेल पुरुषांचा स्वभाव चांगला नाही. आणि व्हिक्टर आफ्रिकेहून आल्यापासून, फारच धक्कादायक होता. त्याने एकदोनदा मला घाबरवून टाकले होते.”

पायरोने हलकेच विचारले, “त्याने मिस लीलीलादेखील घाबरवले होते का?”

“लिली? मला वाटते, तो लिलीला फारसा भेटला नव्हता.”

पायरोने त्याच्या लहानशा वहीत काही लिहिले. मग त्याने पेन्सिल परत ठेऊन दिली व वही खिशात घातली.

“अॅस्टवेल बाईसाहेब, ठीक आहे. आता मी पार्सन्सची मुलाखत घेतो.”

“त्याला इथे बोलावू का?” अॅस्टवेल बाईसाहेबांचा हात घंटीकडे गेला पायरोने ते बघून घाईघाईने म्हटले, “नाही. नाही. हजार वेळा नाही. मीच त्याच्याकडे जातो.”

“जर तुम्हाला तसे करणे बरे वाटत असेल, तर --- “

मुलाखतीत सामील व्हायला न मिळाल्याने, अॅस्टवेल बाईसाहेब थोड्या नाराज झालेल्या वाटल्या.

स्वयंपाकघरात पायरोला पार्सन्स भेटला. तो चांदीला पॉलिश करत होता. पायरोने त्याच्या विनोदी पद्धतीने थोडेसे वाकून सुरवात केली, “मी गुप्तहेर असून, मला स्पष्टीकरण मिळवले पाहिजे.”

पार्सन्स बोलला, “हो, सर. आपण शक्य तेवढी माहिती मिळवायलाच पाहिजे.”

त्याचा स्वर मान देणारा पण कोरडा, काही लागते नसल्यासारखा होता.

पायरोने चालू ठेवले, “अॅस्टवेल बाईसाहेबांनी मला पाठवले. त्या समाधानी नाहीत. मुळीच नाहीत.”

पार्सन्स म्हणाला, “मी त्यांना पुष्कळ प्रसंगी तसे बोलतांना ऐकले आहे.”

पायरो बोलला, "खरे तर, तुम्ही मला तुम्हाला माहिती असलेली हकीगत सांगाल का? तर मग आपण या फालतू बाबींवर वेळ फुकट घालवायला नको. आपण तुमच्या झोपायच्या खोलीत जाऊ व तुम्ही खून झाला त्या रात्री, कायकाय पाहिले, ते सांगा."

स्वयंपाक्याची खोली तळमजल्याला होती. त्याशेजारी नोकरांची खोली होती. त्याला गज असलेल्या खिडक्या होत्या. आणि एका कोपऱ्यात तिजोरी होती. पार्सन्सने त्याचा अरुंद पलंग दाखवला.

"सर, मी अकरा वाजता झोपलो. मिस लीलीदेखील झोपली. आणि ॲस्टवेल बाईसाहेब सर रुबेन यांच्याबरोबर होत्या."

"ॲस्टवेल बाईसाहेब सर रुबेन यांच्याबरोबर होत्या? ठीक आहे, पुढे?"

सर, मनोऱ्याची खोली बरोबर यावरती आहे. जर तिथे कोणी बोलत असेल, ते पुटपुटण्याचा आवाज इथे येतो. पण बोलणे नीट समजत नाही. साडेअकराला मला झोप लागली असावी. बारा वाजता मला पुढचे दार जोराने लावल्याच्या आवाजाने जाग आली. माझ्या लक्षात आले, की मिस्टर लीव्हरसन परतले आहेत. मी पुसटसा पदरव ऐकला. आणि एकदोन मिनिटांने मी सर रुबेन व मिस्टर लीव्हरसन यांना बोलतांना ऐकले.

"सर, मला त्यावेळेला वाटले, की मिस्टर लीव्हरसन प्यायले होते --- खरे तर ते प्यायले होते, असे मला म्हणायचे नाही आहे. पण ते बोलण्यात व हालचालीत, थोडे असेतसेच वाटत होते. मी एखाददोन शब्द ऐकले. पण त्यावरून काय चालले होते, हा काही अर्थबोध झाला नाही. मग जोरात मारलेली किंकाळी व काही जोरदार आवाज ऐकू आला."

थोडा वेळ थांबून पार्सन्सने शेवटचे शब्द परत उच्चारले. तो जोर देत म्हणाला, “फारच मोठा जोरदार असा आवाज!”

पायरो पुटपुटला, “जर मी चुकत नसेन, तर तो बहुतेक कामात असतो तसा अद्भुतरम्य हळूवार आवाज असावा.”

पार्सन्स दडपण घेऊन बोलला, “असेलही, सर. मला जोरदार असा आवाज आला, एवढे खरे.”

पायरो बोलला, “ते लपवलेले शस्त्र असावे का?”

“सर, त्याचा उल्लेख करू नका. शांत वातावरणात असा जोरदार आवाज ऐकल्यावर, मी मिस्टर लीव्हरसन यांचा अगदी साधा सरळ पण चढलेला “अरे देवा, अरे देवा!” असा काहीसा आवाज ऐकला.

पहिल्यांदा पार्सन्स काही सांगायला बिचकत होता. पण नंतर त्याने आनंद घेत, सर्व काही सांगितले. पायरो त्याच्यावर खूष झाला. तो पुटपुटला, “अरे देवा, तुम्हाला तेव्हा काय वाटले असेल!”

“खरेच, सर, तुम्ही म्हणता आहात तसेच वाटले. त्यावेळेस मी फार विचार केला नाही. पण काहीतरी नको ते झाले आहे, एवढे मला समजले व वर जावे का असाही विचार डोक्यात आला. मी दिवा लावायला उठलो आणि दुर्दैवाने खुर्चीवर आदळलो.

“मी दार उघडले. नोकरांच्या हॉलमधून, दुसरे दार उघडून, पॅसेजला लागलो. तेथून मागील जिन्याच्या तळाशी वर जावे की नाही, असा विचार करत, उभा राहिलो. मला वरून मिस्टर लिव्हरसन यांचा हृदयापासूनचा आनंदी असल्यासारखा आवाज आला, ‘नशीबाने काही त्रास झाला नाही.

शुभ रात्र.’ तो शीळ घालत पॅसेजमधून त्याच्या खोलीकडे जाताना मी ऐकले.

“अर्थात मी लगेच परत झोपायला गेलो. काहीतरी आवाज झाला, एवढाच विचार मी केला. सर, मी तुम्हाला विचारतो, मिस्टर लिव्हरसन शीळ घालत, शुभरात्र असे म्हणत जाताना ऐकून, मी असा विचार करायला हवा होता का, की सर रुबेन यांचा खून झाला असेल?”

“तुम्ही नक्की मिस्टर लिव्हरसनचा आवाज ऐकला का?”

पार्सन्सने त्या बेल्जियन माणसाकडे दयेने बघितले. पायरोने बघितले, की पार्सन्सच्या मनात खरा किंवा खोटा --- पण काय तो निर्णय झालेला आहे.

“सर, तुम्हाला मला अजून काही विचारायचे आहे का?”

पायरो बोलला, “अजून एक गोष्ट. तुम्हाला लिव्हरसन आवडत होता का?”

“काय म्हणालात?”

“अगदी साधा प्रश्न आहे. तुम्हाला लिव्हरसन आवडत होता का?”

आधी पार्सन्स चमकला होता पण नंतर लाजला.

“सर, सगळ्या नोकरांचे सामान्य मत --- “ एवढे बोलून तो थांबला.

पायरो म्हणाला, “ठीक आहे, तुम्हाला ते तसे मांडायचे असेल तर तसे मांडा.”

“सर, ते असे आहे, की मिस्टर लिव्हरसन हे मोकळे व उदार तरुण गृहस्थ होते. पण फारसे बुद्धिमान नव्हते, असे मी म्हणू शकेन.”

पायरो बोलला, ‘आहा! पार्सन्स, तुम्हला माहिती आहे का, मिस्टर लिव्हरसन यांना न बघताही माझे त्यांच्याबद्दल हेच मत आहे.”

“सर, खरे का?”

“तुझे काय मत आहे --- मी तुला विचारतो --- मी हॉलमधील नोकरांचे मत विचारले का?”

“तो खूप शांत, धीर असलेला सभ्य माणूस आहे. तो कुणाला त्रास देत नाही.”

पायरो म्हणाला, “खरे आहे.”

स्वयंपाकी खोकला. तो पुटपुटला, “मालकीणबाई त्यांच्या निर्णयात थोडी घाई करत आहेत.”

“तर मग हॉलमधील नोकरांच्या मते, मिस्टर लिव्हरसनने गुन्हा केला?”

पार्सन्स म्हणाला, “आमच्यापैकी कुणालाच तो गुन्हेगार वाटत नाही. आम्ही --- कुणीच असे समजत नाही, की त्याने ते केले असेल.”

पायरोने विचारले, “पण त्याचा स्वभाव थोडा आक्रमक होता, नाही का?”

पार्सन्स त्याच्या जवळ आला. “जर तुम्ही मला असे विचारले, की या घरात सर्वात आक्रमक स्वभाव कोणाचा आहे, तर मी --- “

पायरोने हात उंचावला. तो मृदुपणे म्हणाला, “आहा, पण मी असा प्रश्न विचारू नये. माझा प्रश्न असा असेल, कोणाचा स्वभाव सर्वात चांगला आहे?” पार्सन्स त्याच्याकडे तोंड उघडे टाकून बघत राहिला.

पायरोने त्याच्यावर अजून वेळ घालवला नाही. मित्रत्वाने, थोडेसे वाकून --- तो नेहमीच मित्रत्वाने वागत होता --- तो खोलीबाहेर पडला. बाहेर पडून मॉन रीपोसच्या मोठ्या चौकोनी हॉलमध्ये तो फिरत बसला. तिथे त्याने एकदोन मिनिटे विचार केला. नंतर एक हळू आवाज आल्याने त्याने आनंदी रॉबिनसारखे तिकडे डोके उचलून पाहिले. शेवटी, पाऊले न वाजवता, दार उघडून हॉलच्या बाहेर पडला.

दारात थांबून तो आत बघत राहिला. ती लहान खोली म्हणजे वाचनालय होते. त्याच्या दुसऱ्या बाजूकडे शेवटी एक बारीक, अशक्त तरुण आकृती मोठ्या बाकावर गुंग होऊन काही लिहित होती. त्याने नाकावर क्लिप असलेला चष्मा घातला असून, त्याची हनुवटी निमुळती होती.

पायरोने काही मिनिटे त्याचे निरीक्षण केले. मग त्याने शांतताभंग करत, पूर्णपणे खोटा व नाटकी खोकला काढला.

मिस्टर पायरो खोकला, "खोक् --- खोक्."

तो माणूस लिहायचा थांबला व डोके वळवले. तो उगीच दचकला नाही. पण पायरोला पाहिल्यावर तो गोंधळून गेला.

पायरो थोडा वाकत पुढे आला. "मिस्टर ट्रेफुसीस, मी तुमच्याशी बोलू शकतो का? हो? आहा, माझे नाव हर्क्युल पायरो आहे. ते कदाचित तुम्ही ऐकले असेल."

तो तरुण मनुष्य बोलला, "ओहो, हो --- नक्कीच."

पायरोने त्याच्याकडे नीट पाहिले.

ओवेन ट्रेफुसीस सुमारे तेहेतीस वर्षांचा होता. ॲस्टवेल बाईसाहेबांनी त्याला दोषी ठरवलेले कोणीच गंभीरपणे का घेतले नाही, हे

त्या गुप्तहेराला ट्रेफुसीसकडे बघून लगेच समजले. तो अयोग्य गोष्टींना नाके मुरडणारा, चांगला शांत, सभ्य तरूण माणूस होता. त्याला पद्धतशीरपणे, त्रास दिला जाऊ शकत होता आणि दिला गेलाच होता. पण त्याने कधी पश्चात्ताप झाल्याचे दाखवले नाही.

तो सचिव बोलला, “तुम्हाला अर्थात ॲस्टवेल बाईसाहेबांनी पाठवले असणार. मी तुम्हाला काही मदत करू शकतो का?”

त्याची पद्धत नम्र व आनंदी होती. पायरो खुर्चीवर बसला. आणि सावकाश पुटपुटला, “ॲस्टवेल बाईसाहेब तुमच्याशी त्याना वाटणाऱ्या संशयाबद्दल वा समजाबद्दल काही बोलल्या का?”

ओवेन ट्रेफुसीस थोडा हसला. तो म्हणाला, “या बाबतीत, माझा असा विश्वास आहे, की त्यांचा माझ्यावर संशय आहे. हे चुकीचे आहे. पण आता आहे तर आहे. सर रुबेनचा मृत्यू झाल्यापासून, त्या माझ्याशी साधे असे क्वचितच बोलल्या असतील. मी शेजारून जायला लागलो, की त्या भिंतीला  चिकटायला बघतात.”

तो अगदी सहजपणे बोलत होता. त्याच्या आवाजात पश्चात्तापापेक्षा मनोरंजन जास्त होते. पायरोने मोकळेपणा दाखवत मान हलवली.

त्याने स्पष्ट केले, “आपल्याआपल्यात हे सांगतो, की मलादेखील त्या हेच म्हणाल्या. मी काही त्यांच्याबरोबर वाद घातला नाही --- मी असा नियम बनवला आहे, की सकारात्मक दृष्टीकोन असणाऱ्या बायकांशी वाद घालायचा नाही. तुम्हाला समजले असेल. ते वेळ फुकट घालवणे असते.”

“ओहो, बरोबर आहे.”

“मी म्हणालो, हो, बाईसाहेब --- अगदी बरोबर आहे. त्या शब्दांना काही अर्थ नव्हता. पण त्यामुळे त्यांना दिलासा मिळाला असेल. माझ्या तपासाप्रमाणे मिस्टर लिव्हरसन सोडून कुणीही गुन्हा केलेला नाही. तरीही आतापर्यंत अनेक वेळा अशक्य गोष्टी झालेल्या आहेत.”

सचिव म्हणाला, “मला तुमची स्थिती समजते. मी माझ्याकडून तुम्हाला हवी ती मदत करण्याचा प्रयत्न करेन.”

पायरो म्हणाला, “छान, आपण एकमेकांना समजून घेतले. आता मला त्या संध्याकाळच्या घटना सांगा. जेवणापासून सुरवात करा.”

सचिव बोलला, “जेवायला लिव्हरसन नव्हता, हे तुम्हाला चांगले माहिती आहे. त्याचा त्याच्या मामाशी काही खटका उडाला होता. त्यामुळे तो गोल्फ क्लबमध्ये जेवायला गेला होता. त्यामुळे सर रुबेन फार वाईट मनस्थितीत होते.”

पायरोने नाजूकपणे सुचवले, “फार आनंदी वाटत नव्हता, नाही का?

ट्रेफुसीस हसला. “तो टार्टार [ मंगोलियन वा तुर्की ] होता. त्याच्या बऱ्याचशा लहानसहान पद्धती त्याच्याबरोबर नऊ वर्षे काम करून, मला माहिती झाल्या होत्या. मिस्टर पायरो, तो असामान्यपणे कठीण मनुष्य होता. त्याच्या समीप येणाऱ्या कोणालाही तो शिवीगाळ करू शके व मुलांसारखा त्याचा राग अनावर होई.

मला त्याची सवय झाली होती. तो काय म्हणेल त्याकडे मी मुळीच लक्ष देत नसे. खरे तर तो स्वभावाने वाईट नव्हता. पण त्याच्या पद्धती मूर्खपणाच्या व चिडचिड करणाऱ्या होत्या. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे मी ठरवले होते, की त्याला कधीही उलटे उत्तर द्यायचे नाही.”

"त्या बाबतीत इतर लोक तुमच्यासारखे शहाणे होते का?

ट्रेफुसीसने खांदे शहारवले. तो म्हणाला, "ॲस्टवेल बाईसाहेबांनी मनापासून आनंद घेतला. तिला सर रुबेनची जराही भीती वाटत नसे. ती नेहमी त्याच्यावर दादागिरी गाजवे आणि त्याला बरोबर वागायला लावे. सर रुबेन तिच्याशी पूर्णपणे एकनिष्ठ होते."

"त्या रात्री त्यांचे भांडण झाले होते का?

सचिवाने कडेने त्याच्याकडे पाहिले. क्षणभर त्याने कां कू केले. मग तो म्हणाला, "मला असे वाटते, पण तुम्ही का विचारले?"

'एक कल्पना म्हणून, एवढेच."

सचिवाने स्पष्टीकरण दिले, "अर्थात मला काही माहिती नाही. पण गोष्टी त्या दिशेने चाललेल्या वाटत होत्या."

पायरोने तो विषय सोडून दिला. "जेवायला अजून कोणकोण होते?"

मिस मार्ग्रेव्ह, मिस्टर व्हिक्टर ॲस्टवेल आणि मी."

"नंतर काय झाले?"

"आम्ही हॉलमध्ये गेलो. सर रुबेन तिथे आले नाहीत. सुमारे दहा मिनिटांनी ते आले आणि एका पत्राबाबतच्या काही किरकोळ गोष्टीवरून, मला जोराने ओरडले. मी त्यांच्याबरोबर वर मनोऱ्याच्या खोलीत गेलो. आणि काय ते त्यांच्या मनासारखे करून दिले. मग मिस्टर व्हिक्टर ॲस्टवेल आले व म्हणाले, की त्याना त्यांच्या भावाशी, काही बोलायचे आहे. मी खाली जाऊन, दोन बायकांमध्ये मिसळलो.

सुमारे पाऊण तासाने, मला सर रुबेन यांची घंटी जोराने वाजतांना ऐकू आली. पार्सन्स सांगत आला, की तो वर सर रुबेन यांच्याकडे

ताबडतोब चालला आहे. मी खोलीत शिरलो, तेव्हा मिस्टर व्हिक्टर ॲस्टवेल बाहेर पडत होता. त्याची माझ्याशी जवळजवळ टक्कर झाली. त्याने नाराज होण्यासारखे काही घडले होते. तो फार आक्रमक दिसत होता. मी विश्वास ठेवला, की त्याने मला पाहिले नसावे.''

''सर रुबेनने या गोष्टीबद्दल काही शेरा मारला का?''

ते म्हणाले, ''व्हिक्टर वेडा आहे. न आवरता येणारा आक्रमक राग जेव्हा त्याला येईल, तेव्हा तो एखादे दिवशी कुणालातरी काहीतरी करेल.''

पायरो उद्गारला, ''आहा, काय त्रास होता, याची तुम्हाला काही कल्पना आहे का?''

''मला काहीच कल्पना नाही.''

पायरोने सावकाशीने सचिवाकडे मान वळवून, पाहिले. ते शेवटचे शब्द फार घाईने उच्चारले गेले होते. त्याची खात्री झाली, की ट्रेफुसीसची इच्छा असती, तर तो अजून काही सांगू शकला असता. पण परत एकदा पायरोने लावून धरले नाही. ''आणि मग? मी तुम्हाला पुढे सांगायची विनंती करतो.''

''मी सर रुबेनबरोबर अजून दीड तास काम केले. अकरा वाजता ॲस्टवेल बाईसाहेब आल्या. तेव्हा सर रुबेन मला म्हणाले, की मी झोपायला जाऊ शकतो.''

''आणि तुम्ही गेलात?''

''हो.''

''बाईसाहेब तिथे किती वेळ होत्या, याची तुम्हाला काही कल्पना आहे का?''

“नाही. त्यांची खोली पहिल्या मजल्यावर आहे. माझी दुसऱ्या मजल्यावर आहे. त्यामुळे त्या केव्हा झोपायला गेल्या, हे मी सांगू शकत नाही.”

“अस्स.” पायरोने एकदोनदा मान हलवली व उठून उभा राहिला. “मिस्टर आता मला मनोऱ्याच्या खोलीत न्या.”

तो सचिवाच्या मागे मोठा जिना थोडासा चढून गेला. मग पॅसेजमधून जात ते खेळायच्या खोलीच्या दाराशी गेले. तिथून शेवटपर्यंत जात, नोकरांच्या जिन्याशी आले. तो चढून, पुन्हा एकदा लहानशा पॅसेजशी आले. एका दारातून जात गुन्हा घडलेल्या जागेशी आले.

ती माळा असलेली खोली, इतर खोल्यांपेक्षा दुप्पट उंचीची होती. साधारण तीस फुटांचा चौरस होता. भिंतींवर तलवारी व भाले लावलेले होते. आणि देशी बनावटीच्या खूप वस्तु टेबलांवर मांडलेल्या होत्या. पलीकडील बाजूला खिडकीजवळ मोठे लिहायचे टेबल होते. पायरोने ते ओलांडले.

सर रुबेन इथे मेलेले सापडले का?”

ट्रेफुसीसने मान हलवली.

मला वाटते, त्याना मागून धक्का बसला?”

परत सचिवाने मान हलवली. त्याने स्पष्ट केले, “एका देशी काठीने गुन्हा केला गेला. मोठी वजनदार वस्तु. ते जागच्या जागी मरण पावले असावेत.”

यामुळे अशी पुष्टी मिळते, की खून आधी ठरवून केला गेला नाही. मोठे भांडण झाले व नकळत, शस्त्र काढले गेले.”

“हो, बिचाऱ्या लिव्हरसनने हे केले नसावे.”

“आणि प्रेत टेबलाच्च्या पुढे पडलेले सापडले?”

“नाही, ते घसरून जमिनीवर कडेला पडले होते.”

पायरो उद्गारला, “हे चौकस वाटण्यासारखे होते.”

सचिवाने विचारले, “चौकस का?”

लिहायच्च्या टेबलाच्च्या पॉलिश केलेल्या तुकतुकीत पृष्ठभागावर पडलेल्या वेड्यावाकड्या आकाराच्च्या डागाकडे निर्देश करत, पायरो म्हणाला, “यामुळे. “माझ्या मित्रा, तो रक्ताचा डाग आहे.”

ट्रेफुसीसने सुचवले, “रक्त तिकडे उडाले असेल. किंवा नंतर प्रेत हलवले, तेव्हा तसे झाले असेल.”

छोटा मनुष्य म्हणाला, “शक्य आहे. खूप शक्यता आहेत. या खोलीला एकच दार आहे?”

“इथे जिना आहे.”

खोलीच्च्या कोपऱ्यातील दाराजवळील मखमली पडदा ट्रेफुसीसने खेचला. तिथून एक गोल जिना वर जात होता.

“ही जागा पहिल्यांदा एका खगोलशास्त्रज्ञाने बांधली होती. जिन्याने वर गेल्यावर तिथे दुर्बिण बसवली होती. सर रुबेनने ती झोपायची खोली बनवली होती. ते खूप उशीरापर्यंत काम करत बसले, तर तिथे झोपत असत.”

पायरो सहज जिना चढून गेला. वरील गोल खोली फारसे फर्निचर नसलेली होती. एक पलंग, एक खुर्ची, आणि ड्रेसिंग टेबल. तिथून बाहेर

पडायला दुसरे दार नसल्याचे बघून पायरोला बरे वाटले. मग तो परत खाली आला. तिथे ट्रेफुसीस त्याची वाट बघत उभा होता.

पायरोने विचारले, “तुम्ही मिस्टर लिव्हरसनना येतांना ऐकले का?”

ट्रेफुसीसने मान हलवली. “तेव्हा मी गाढ झोपलो होतो.”

पायरोने मान हलवली. त्याने सावकाशीने खोलीभर नजर फिरवली. शेवटी तो म्हणाला, “अरे मित्रा, तू पडदे ओढ़्लेस तर बरे होईल. इथे आता अजून काही बघण्यासारखे आहे, असे मला वाटत नाही.”

आज्ञाधारकपणे ट्रेफुसीसने काळे जाड पडदे खिडकीवर ओढले. पायरोने दिवा बंद केला. त्याला छतापासून लोंबणाऱ्ी, पांढऱ्ी, नक्षीदार शेड होती.

“टेबलावर दिवा होता का?”

उत्तरादाखल सचिवाने लिहायच्या टेबलावरील हिरव्या शेडचा प्रखर दिवा लावला. पायरोने तो बंद केला. परत लावला व परत मालवला.

“छान! माझे इथले काम संपले आहे.”

सचिव पुटपुटला, “जेवण रात्री साडेसातला आहे.”

“मिस्टर ट्रेफुसीस, मी तुमचा आभारी आहे.”

“त्यात काय एवढे!”

पायरो पॅसेजमधून त्याच्याकरता असलेल्या खोलीत जाताना, विचार करत होता. समज नसणाऱ्ा जॉर्ज त्याच्या मालकाचे सामान लावत होता. पायरो म्हणाला, “अरे माझ्या जॉर्ज, मी अशी आशा करतो, की जेवणाच्या वेळी मी माझी उत्सुकता वाढवणाऱ्या एका गृहस्थाला भेटणार

आहे. तो विषुववृत्तीय प्रदेशात रहाणारा आहे. त्याचा स्वभावही तसाच तापट आहे --- असे म्हटले जाते. लीलीने त्याचा उल्लेख केला नाही, पण पार्सन्सने मला त्याच्याबद्दल सांगितले. मृत सर रुबेन यांचा स्वतःचा असा एक स्वभाव होता. समजा ते अशा एका माणसाच्या सहवासात आले, की ज्याचा स्वभाव त्यांच्यापेक्षाही वाईट आहे --- तर तू काय म्हणशील? तर फारच वाईट परिस्थिती निर्माण होईल, नाही का?" "सर, कहरच होईल. पण सर, असे नेहमीच होत नाही, फक्त कधीतरी."

"होत नाही?"

"नाही, सर. जेमिना नावाची माझी आत्या होती. तिची जीभ फार तिखट होती. तिच्याबरोबर रहाणाऱ्या तिच्या बहिणीला तिने काहीतरी धक्कादायक केले. तिला जवळजवळ आयुष्यातून उठवले. जर कोणी बहिणीच्या बाजूने उभे राहिले, तर गोष्ट वेगळी होती. पण असे शरण जाणे तिला सहन झाले नसते."

पायरो म्हणाला, "हं --- हे सूचक आहे."

जॉर्ज याचनेच्या सुरात खोकला. त्याने नाजूकपणे विचारले, "सर, मी तुम्हाला या बाबतीत काही मदत करू शकतो का?"

पायरो तत्परतेने म्हणाला, "नक्कीच, तू माझ्यासाठी हे शोधून काढ, की त्या रात्री लिली मार्ग्रेव्हने कुठल्या रंगाचे कपडे घातले होते आणि कुठली नोकराणी तिच्या सेवेत होती.

जॉर्जने त्याच्या नेहमीच्या उदासीनतेने या आज्ञा झेलल्या.

"ठीक आहे, सर. मी सकाळी ही माहिती तुम्हाला देतो."

पायरो शेकोटीतील विस्तवाकडे निरखून बघत, उठून उभा राहिला.

तो पुटपुटला, “जॉर्ज, तू मला फार उपयोगी पडतोस. तुला माहिती आहे का, की मी तुझ्या जेमिनाआत्याला विसरू शकत नाही?”

पायरो त्या रात्री शेवटी व्हिक्टर ॲस्टवेलला भेटला नाही. फोनवर त्याच्याकडून निरोप आला, तो लंडनमध्ये अडकलेला आहे.

पायरोने ॲस्टवेल बाईसाहेबांना विचारले, की तो त्यांच्या मृत नवऱ्याच्या व्यवसायासंबंधी काही कामे करतो आहे का.

तिने स्पष्ट केले, “तो त्यात भागीदार होता. त्यासाठी आफ्रिकेत जाऊन खाणीच्या कामात काही सूट मिळते का, हे बघायला तो गेला होता, नाही का लिली?”

“हो, ॲस्टवेल बाईसाहेब.”

“मला वाटते, सोन्याच्या खाणी की तांब्याच्या? लिली, तुला नक्कीच माहिती असेल, कारण तू सतत रुबेनला प्रश्न विचारत असायचीस. अग लाडके, काळजी घे. आता ती फुलदाणी पडत होती.”

मुलगी बोलला, “शेकोटीसमोर इथे फार गरम होते आहे. मी --- मी खिडकी थोडी उघडू का?”

ॲस्टवेल बाईसाहेब शांतपणे म्हणाल्या, “तुला आवडत असेल, तर उघड.”

मुलगी खिडकीशी चालत गेली व तिने ती उघडली. पायरो तिला न्याहाळत होता. रात्रीच्या थंड हवेचा झोत अंगावर घेत, ती तिथे एक मिनिट उभी राहिली. जेव्हा ती परत येऊन बसली, तेव्हा पायरो तिला नम्रपणे म्हणाला, “म्हणजे तुम्हाला खाणीत रुची आहे तर?”

मुलगी बेपर्वाईने म्हणाली, “ओहो, खरे तर नाही. मी सर रुबेन यांचे बोलणे ऐकायची. पण त्या विषयाबद्दल मला काही माहिती नाही.”

ॲस्टवेल बाईसाहेब म्हणाल्या, “तू सोंग छान केलेस. बिचारा रुबेन त्याला वाटले, की तुझ्या या प्रश्न विचारण्यामागे छुपा हेतू आहे.

छोट्या गुप्तहेराचे डोळे आगीवर खिळलेले होते. तथापि लिली मार्ग्रेव्हच्या चेहऱ्यावरील काळजी व दुःख त्याला दिसल्यावाचून राहिले नाही. युक्तीने त्याने संभाषण वळवले. जेव्हा शुभ रात्र म्हणायची वेळ झाली, तेव्हा पायरो त्याच्या यजमान बाईंना म्हणाला, “बाईसाहेब, मी तुमच्याशी दोन शब्द बोलू शकतो का?”

लिली मार्ग्रेव्ह हळूच निघून गेली. ॲस्टवेल बाईसाहेबांनी पायरोकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले.

“त्या रात्री सर रुबेनना जिवंत बघणाऱ्या तुम्ही शेवटच्या व्यक्ती होतात का?”

तिने मान हलवली. तिच्या डोळ्यातून अश्रू ओघळले आणि तिने घाईने काळ्या कडा असलेला एक रुमाल त्यावर घरला.

“आहा, तुम्ही स्वतःला त्रास करून घेऊ नका. मी तुम्हाला विनंती करतो, की तुम्ही स्वतःला त्रास करून घेऊ नका.”

“मिस्टर पायरो, ते ठीक आहे. पण माझा नाईलाज आहे. अशा तऱ्हेने फालतू कारणावरून चिडणारी मी तिहेरी मूर्ख आहे.”

“नाही. नाही. तुम्ही काय सांगत होतात?”

“ते अकरा वाजण्यासंबंधी होते. मला वाटते, जेव्हा तुम्ही मनोऱ्याच्या खोलीत गेलात, तेव्हा मिस्टर ट्रेफुसीसला सर रुबेनने घालवून दिले, बरोबर?

“हो. साधारण त्याच वेळी असावे.”

“तुम्ही किती वेळ त्यांच्याबरोबर होतात?”

“मी तिथून जायला उठले, तेव्हा पावणेबारा वाजले होते. मी घड्याळाकडे पाहिलेले मला आठवते आहे.”

“ॲस्टवेल बाईसाहेब, तुम्ही मला सांगू शकाल का, की तुमच्या नवऱ्याबरोबर तुमचे कुठल्या विषयावर संभाषण चालू होते?”

ॲस्टवेल बाईसाहेब सोफ्यावर धपकन बसल्या व कोलमडून पडल्या. त्या जोरजोरात हुंदके देत होत्या. त्या दुःखी आवाजात म्हणाल्या, “आम्ही भां --- भांड --- भांडलो.

पायरोचा आवाज कोवळा व समजूत घातल्यासारखा होता. “कुठल्या कारणाने?”

“खू --- खूप गोष्टी होत्या. ली --- लिलीच्या विषयाने सु --- सुर --- सुरवात झाली. रुबेनला --- काही कारणाशिवाय --- ती आवडत नव्हती. तो म्हणाला, की ती त्याच्या कागदपत्रांमध्ये ढवळाढवळ करत होती. त्याला तिला बाहेर घालवून द्यायचे होते. मी म्हणाले, की ती आवडती मुलगी होती आणि मी तसे करणार नाही. मग तो माझ्या अंगावर ओ --- ओर --- ओरडू लागला. मला त्याचा राग आला. त्यामुळे मला त्याच्याबद्दल काय वाटते, ते मी त्याला सांगितले.

“मिस्टर पायरो, मला खरेच तसे वाटत होते. तो म्हणाला, त्याने मला गटारातून बाहेर काढून, माझ्याशी लग्न केले. आणि मी म्हणाले --- आहा, पण त्याचे आता काय? मी मला कधीच क्षमा करणार नाही. मी नेहमीच माझ्या मनातले बोलून मोकळी होत असे. कोणीतरी त्याचा त्याच रात्री खून करणार आहे, हे मला कसे माहिती असणार? बिचारा, म्हातारा रुबेन.”

पायरोने हे तिच्या मनातील सर्व खदखदणे, सहानुभूतीपूर्वक ऐकून घेतले.

तो म्हणाला, “तुमच्या त्रासाला मी कारणीभूत ठरलो. मी क्षमा मागतो. आता आपण जेवढ्यास तेवढे संबंध ठेऊ --- अगदी व्यावहारिक. तुम्ही अजून तुमच्या कल्पनेला चिकटून आहात का, की मिस्टर ट्रेफुसीसने तुमच्या नवऱ्याला मारले?”

अॅस्टवेल बाईसाहेबांनी स्वतःला सावरले. त्या गंभीरपणे बोलल्या, “मिस्टर पायरो, ही एका बाईची अंतर्गत सहजप्रवृत्ती आहे. खोटे नाही.”

पायरो म्हणाला, “ठीक आहे. बरोबर आहे. पण त्याने हे केव्हा केले?

“केव्हा? अर्थात मी तिथून गेल्यावर.”

“तुम्ही पावणेबारा वाजता सर रुबेनकडून निघालात. बाराला पाच मिनिटे असतांना मिस्टर लिव्हरसन तिथे आले. या दहा मिनिटात तुम्ही म्हणता आहात की सचिव त्याच्या झोपायच्या खोलीतून आला व त्याने सर रुबेनचा खून केला?”

“हे अगदी शक्य आहे.”

पायरो म्हणाला, “तशा पुष्कळ गोष्टी शक्य आहेत. ते दहा मिनिटात केले गेले. अहा, हो! पण केले गेले का?”

ॲस्टवेल बाईसाहेब बोलल्या, “अर्थात, तो म्हणतो, की तो तेव्हा गाढ झोपलेला होता. पण तसे होते की नाही, कुणाला माहीत?”

पायरोने तिला आठवण करून दिली, “तिथे आसपास कुणी त्याला बघितले नाही.”

ॲस्टवेल बाईसाहेब विजयाने बोलल्या, “प्रत्येकजण झोपलेला होता. त्यामुळे अर्थात कोणी त्याला बघितले नाही.

पायरो स्वतःशी बोलला, “मला नवल वाटते.”

थोडी शांतता. “ठीक आहे, ॲस्टवेल बाईसाहेब, शुभरात्र.”

जॉर्जने त्याच्या मालकाच्या अंथरुणाशेजारी सकाळची लवकरची कॉफी ठेवली.

“सर मिस लिलीने त्या रात्री हलक्याशा हिरव्या रंगाचा शिफॉनचा ड्रेस घातला होता. ग्लॅडिज नावाची तिसरी नोकराणी मिस लिलीची काळजी घेते.”

“जॉर्ज, आभारी आहे. तू मोठा विश्वासार्ह माणूस आहेस.”

“सर, त्यात काय मोठेसे?”

खिडकीतून बाहेर बघत, पायरो म्हणाला, “आजची सकाळ छान आहे. कोणीच सकाळी लवकर उठणार नाही. मला वाटते, जॉर्ज, आपण मनोऱ्याच्या खोलीत जाऊन एक लहानसा प्रयोग करू.”

“सर, तुम्हाला माझी गरज आहे का?”

“प्रयोगाचा काही त्रास नाही.”

ते आले तेव्हा, मनोऱ्याच्या खोलीत अजून पडदे ओढलेले होते. जॉर्ज ते सरकवणार होता, तेव्हा पायरोने त्याला थांबवले.

“आपण खोली जशी आहे, तशीच सोडू. फक्त टेबलावरील दिवा लाव.”

नोकराने तसे केले.

“जॉर्ज, आता त्या खुर्चीत बस. तू लिहित आहेस, असे नाटक कर. छान! मी एक काठी घेतो. मी तुझ्यामागे उभा रहातो. मी तुझ्या डोक्यावर मागून प्रहार करतो.”

जॉर्ज म्हणाला, “ठीक आहे.”

पायरो म्हणाला, “पण मी जेव्हा तुला मारेन, तेव्हा लिहित राहू नकोस. तुला कळले का, मी अजून स्पष्ट करू शकत नाही. खुन्याने सर रुबेनला मारले, तितक्या जोराने मी तुला मारू शकणार नाही. इथपर्यंत आले, की तुला नाटक करावे लागणार. मी तुला डोक्यावर मारल्यावर, तू पडशील, असा. हात मोकळे असतील. शरीर वेडेवाकडे असेल. मला तुला तसे करायला दे. नाही, पण तुझे स्नायू वाकडे होऊ देऊ नकोस.”

त्याने फार चिडचिड झाल्यासारखा सुस्कारा टाकला.

तो म्हणाला, “जॉर्ज, तू तुझ्या पँटवर चांगला जोर दे. पण कल्पना कर, की तू असे मुद्दाम करत नाही आहेस. उठ आणि मला तुझी जागा घेऊ दे.”

त्याच्या जागी पायरो टेबलावर लिहित बसला.

त्याने जाहीर केले, “मी लिहितो आहे. मी त्यात गुंग झालो आहे. तू मागे येतोस. तू काठीने माझ्या डोक्यावर मागून प्रहार करतोस. मी पुढे कोलमडतो, पण फार पुढे नाही. कारण खुर्ची खाली आहे आणि टेबल उंच आहे. शिवाय माझे हात मला आधार देत आहेत. माझ्यासाठी हे कर, जॉर्ज, दाराकडे जा. तिथे उभा रहा. आणि तुला काय दिसते, ते सांग.”

“माफ करा.”

उत्तेजन देत, “हो, जॉर्ज?”

“सर, मला तुम्ही टेबलाशी बसलेले दिसता.”

“टेबलाशी बसलेले दिसतो?”

जॉर्जने स्पष्ट केले, “सर, नीट बघायला कठीण जाते आहे. कारण अंतर जास्त आहे. आणि दिव्याला मोठी शेड आहे. जर मी दिवा थोडा सरकवला, तर?”

त्याचा हात बटणाकडे गेला.

पायरो कडकपणे बोलला, “नाही अजिबात नको. आपण आहोत, तसेच ठीक आहोत. इथे मी टेबलावर वाकलेलो आहे व तू दारात उभा आहेस. जॉर्ज, आता माझ्याकडे ये. पुढे ये. तुझा हात माझ्या खांद्यावर ठेव.”

जॉर्जने आज्ञापालन केले. माझ्यावर थोडासा वाकून तुला स्थिर कर. हं अस्से! छान!”

पायरोचे दुखावलेले शरीर खुबीने कडेला घसरते. “मी असा --- पडतो. ही चांगली कल्पना आहे. आता काही महत्वाचे करायचे आहे.”

नोकर म्हणाला, “खरेच का, सर?”

“हो, मी न्याहारी नीट केलेली असणे गरजेचे आहे.”

तो छोटा मनुष्य त्याच्या विनोदावर जोराने हसला.

“जॉर्ज, पोटाकडे दुर्लक्ष करता कामा नये.”

जॉर्ज एक नापसंतीदर्शक कटाक्ष टाकत, शांत राहिला. पायरो गालातल्या गालात हसत, खालच्या मजल्यावर गेला. ज्या तऱ्हेने घटना आकार घेत होत्या, त्यामुळे तो खूष होता. न्याहारीनंतर त्याने ग्लॅडिजशी, तिसऱ्या नोकराणीशी, ओळख करून घेतली. ती गुन्ह्याबद्दल काय सांगते, ताची त्याला उत्सुकता होती. तिला जरी चार्ल्स गुन्हेगार आहे, हे नक्की माहिती होते, तरी तिला त्याच्याबद्दल सहानुभूती होती.

“बिचारा तरुण माणूस, सर, हे कठीण वाटते, खरेच कठीण वाटते. त्या वेळी, त्याचा त्याच्यावर ताबा नसणे कठीण वाटते.”

पायरोने सुचवले, “तो आणि मिस लिली यांचे चांगले जमत असणार, कारण तेवढीच दोन तरुण माणसे घरात होती.”

ग्लॅडिजने मान हलवली. “मिस लिली त्याच्याबरोबर थोड्या दुराव्यानेच वागायची. वहावत जायची नाही. साधे सरळ वागायची.”

“त्याला ती आवडत होती का?”

“ओहो, नुसते बोलण्यापुरती. त्यात काही त्रास नव्हता. सर, मिस्टर व्हिक्टर अॅस्टवेल आता मिस लिलीवर भाळला आहे.”

ती हसली.

“ते तसे आहे का?”

ग्लॅडिज पुन्हा हसली. “तो सरळसरळ तिच्यावर भाळलेला दिसत होता. मिस लिली लिलीच्या फुलासारखीच आहे, नाही का? सर, इतकी उंच आणि सोनेरी छटा असलेले केस.”

पायरोने विचार केला, ‘तिने संध्याकाळचा हिरवा फ्रॉक घातला असणार. हिरव्या रंगाची एक विशिष्ट शेड --- “

ग्लॅडिज बोलली, हो, तिच्याकडे तसे कपडे आहेत. अर्थात ती आता शोकात असल्याने, ते घालू शकत नाही. पण सर रुबेन वारले, त्या रात्री तिच्या अंगावर तेच होते.”

पायरो म्हणाला, “ते फिकट हिरव्या रंगाचे होते, गडद नव्हे.”

“हो सर, ते फिकट हिरवे होते. तुम्ही एक मिनिट थांबलात, तर मी तुम्हाला दाखवते. मिस लिली आताच कुत्र्याबरोबर बाहेर गेली आहे.”

पायरोने मान डोलवली. त्याला ते ग्लॅडिजइतकेच माहिती होते. खरे तर लिलीला सुरक्षितपणे घराबाहेर पडलेले पाहिल्यावरच, तो नोकराणीच्या शोधात आला होता. ग्लॅडिज घाईने गेली आणि काही मिनिटात, हँगरवर लावलेला तो संध्याकाळचा हिरवा ड्रेस घेऊन आली.

पायरो पुटपुटला, “किती सुंदर आणि नाजूक! मला तो मिनिटभर उजेडात नेऊ दे.”

त्याने तो ग्लॅडिजकडून घेतला व वळून तो घाईने खिडकीजवळ गेला. तो त्यावर वाकला मग तो हातभर अंतरावर धरला.

त्याने जाहीर केले, “हे अगदी तंतोतंत आहे. फारच मनोहर आहे. मला तो दाखवल्याबद्दल मी आभारी आहे.”

ग्लॅडिज बोलली, “आम्हाला माहिती आहे की फ्रेंच माणसांना स्त्रियांच्या ड्रेसमध्ये रुची असते.”

पायरो पुटपुटला, “तुम्ही खूप दयाळू आहात.”

त्याने तिला घाईने परत ड्रेस घेऊन जातांना पाहिले. मग त्याने त्याच्या दोन्ही हातांकडे पाहिले व हसला. उजव्या हातात लहानशी नखे कापायची कात्री होती आणि डाव्या हातात, हिरव्या शिफॉनचा तुकडा होता.

तो पुटपुटला, “आणि आता, मी नायकगिरी करतो.”

तो त्याच्या सदनिकेकडे गेला आणि जॉर्जला म्हणाला, “जॉर्ज, ड्रेसिंग टेबलावर रुमालाची एक सोनेरी पिन पडली आहे.”

“हो, सर.”

“धुवायच्या स्टँडवर कार्बोलीकचे द्रावण पडले आहे. त्यात त्या पिनेचे टोक बुडव.”

जॉर्जने सांगितल्याप्रमाणे केले. त्याने फार पूर्वीच त्याचा मालकाच्या विचित्र वागण्याबद्दल, काही नवल वाटून घ्यायचे सोडून देले होते. तो म्हणाला, सर, मी ते केले.”

“छान! आता इकडे बघ. मी तुझ्याकडे माझे पहिले बोट करतो. त्यात पिनेचे टोक घुसव.”

“सर, माफ करा. तुम्ही मला तुम्हाला ते टोचायला सांगता आहात?”

“हो, तुझा तर्क बरोबर आहे. रक्त निघाले पाहिजे. समजले का? पण फार नाही.”

जॉर्जने त्याच्या मालकाचे बोट पकडले. पायरोने डोळे बंद केले व मागे झाला. नोकराने रुमालाच्या पिनेने बोटाला टोचले. पायरोने एक किंकाळी मारली. तो म्हणाला, "हे केल्याबद्दल मी तुझे आभार मानतो. तू केलेस ते पुरेसे आहे."

खिशातून हिरव्या शिफॉनचा एक तुकडा घेऊन, त्याने त्यावर त्याचे बोट काळजीपूर्वक पद्धतीने दाबले. तो त्या परिणामाकडे बघत म्हणाला, "त्या कृतीचा यशस्वी परिणाम होऊन, चमत्कार झाला. जॉर्ज, तुला काही उत्सुकता वाटत नाही का? पण हे कौतुकास्पद आहे."

नोकराने आता काळजीपूर्वक पद्धतीने खिडकीबाहेर पाहिले. तो पुटपुटला, "सर, एक गृहस्थ मोठी गाडी चालवत आला."

पायरो भरभर उभा रहात बोलला, "आहा! आहा! मिळायला अवघड असे मिस्टर व्हिक्टर ॲस्टवेल. मी खाली जाऊन त्यांची ओळख करुन घेतो.

मिस्टर व्हिक्टर ॲस्टवेलला बघण्यापूर्वी काही वेळ पायरोने त्याच्याबद्दल ऐकले होते. हॉलमधून मोठा आवाज आला. "अरे मूर्खा, तू काय करतो आहेस, याकडे लक्ष दे. त्या केसमध्ये पेला आहे. पार्सन्स, तुला मी सांगतो आहे, तू यात पडू नकोस. मूर्खा, ते ठेऊन दे."

पायरो चपळपणे जिना उतरला.  मिस्टर व्हिक्टर ॲस्टवेल मोठा माणूस होता. पायरोने त्याला नम्रपणे अभिवादन केले. तो मोठा माणूस ओरडला, "तू कोण आहेस?" पायरो परत वाकला. "माझे नाव हर्क्युल पायरो आहे." "अरे देवा, म्हणजे तुला नॅन्सीने पाठवले आहे, हो ना?" त्याने पायरोच्या खांद्यावर हात ठेवला व त्याला वाचनालयाकडे नेले. त्याच्याकडे

वरपासून खालपर्यंत बघत त्याने शेरा मारला, “मी आता जे बोललो, त्याबद्दल मला माफ करा. तो माझा चालक गाढव माणूस आहे. आणि पार्सन्स मला नेहमी चिरडीला आणतो. तो उगीच अघळपघळ बोलत बसणारा मूर्ख आहे.”

तो थोड्या क्षमायाचनेच्या सुरात म्हणाला, “मला आनंदाने मूर्ख लोकांना सहन करता येत नाही. पण मिस्टर पायरो, काही झाले तरी तुम्ही मूर्ख नाही आहात, नाही का?”

तो जोरात हसला.

पायरो शांतपणे बोलला, “जे असे समजतात, त्यांचा काही गैरसमज झालेला असतो.

“असे आहे का? ठीक आहे. तर तुम्हाला नॅन्सीने पाठवले आहे --- तिच्या मनात सचिवाबद्दल काही संशय आहे. त्यात काही अर्थ नाही. ट्रेफुसीस दुधाप्रमाणे निष्पाप आहे --- तो दूध पितोही. माझा विश्वास आहे, तो कधीही दारू पित नाही. त्याच्यावर तुमचा वेळ उगीच फुकट जाईल, नाही का?”

पायरो शांतपणे बोलला, “जर कुणाला मनुष्यस्वभाव पारखण्याची संधी मिळाली, तर वेळ कधीच फुकट जात नाही.”

“मनुष्यस्वभाव?” व्हिक्टर ॲस्टवेल त्याच्याकडे निरखून बघू लागला. मग तो एका खुर्चीत बसला. “मी तुमच्यासाठी काय करू शकतो?”

“तुम्ही मला त्या दिवशी संध्याकाळी तुमचे तुमच्या भावाशी कशावरून भांडण झाले, ते सांगा.”

व्हिक्टर ॲस्टवेलने डोके हलवले. फसवल्यासारखे, तो बोलला, “त्याचा या केसशी काही संबंध नाही.”

पायरो म्हणाला, “अशी खात्री कुणालाही देता येत नाही.”

“याचा चार्ल्स लिव्हरसनशीदेखील काही संबंध नाही.”

ॲस्टवेल बाईसाहेबांनादेखील तसेच वाटते, की त्याचा या केसशी काही संबंध नाही.”

“ओहो, नॅन्सी!”

“पार्सन्स धरून चालला आहे, की चार्ल्स लिव्हरसन त्या रात्री तिथे आला होता. पण त्याने त्याला पाहिले नाही. कुणालाच त्याला पाहिल्याचे आठवत नाही.”

“हे अगदी साधे आहे. रुबेन तरुण चार्ल्सवर ओरडत होता. ते काही योग्य कारणासाठी असावे. नंतर तो मला त्रास द्यायला बघत होता. मी त्याला त्रास व्हावा म्हणून मी मुलगा असतानाची काही घरगुती सत्ये सांगितली. जमीन कशी पसरलेली आहे, यासंबंधी बोलण्यासाठी, त्या रात्री आमचे भेटायचे ठरले होते. मी माझ्या खोलीत गेल्यावर झोपायला गेलो नाही. त्याऐवजी, मी दार उघडे टाकले व सिगरेट ओढत, खुर्चीवर बसून राहिलो. माझी खोली दुसऱ्या मजल्यावर आहे. आणि चार्ल्सची खोली माझ्या शेजारी आहे.”

“मी तुम्हाला मध्येच थांबवतो आहे, त्याबद्दल क्षमा करा, पण मिस्टर ट्रेफुसीसची खोली पण त्याच मजल्यावर आहे का?”

ॲस्टवेलने होकार देत मान हलवली. “माझ्यापलीकडेच त्याची खोली आहे.”

“जिन्याजवळ का?”

“नाही दुसऱ्या बाजूला.”

पायरोच्या चेहऱ्यावर प्रकाश चमकला. पण दुसऱ्याच्या ते लक्षात आले नाही. त्याने पुढे चालू ठेवले, “मी सांगितल्याप्रमाणे चार्ल्ससाठी थांबलो होतो. मी पुढचे दार उघडलेले ऐकले. पण दहा मिनिटे झाली तरी, चार्ल्सचा काही पत्ता नव्हता. मग तो जिन्याजवळ आला, तेव्हा फार रात्र झाल्यामुळे आता याच्याशी बोलण्यात काही अर्थ नाही, असे मी ठरवले.”

त्याने त्याचे कोपर मुद्दाम उचलले.

पायरो पुटपुटला, “अस्स.”

ॲस्टवेल म्हणाला, “त्या बिचाऱ्याला नीट चालतादेखील येत नव्हते. तो फार भीतीदायकदेखील दिसत होता. मी ते सोडून दिले. पण अर्थात आता मला जाणवते आहे की तो सरळ खून करून आला होता.”

पायरोने ताबडतोब एक प्रश्न विचारला, “तुम्हाला मनोऱ्याच्या खोलीतून काही आवाज ऐकू आले नाहीत?”

“नाही. पण तुम्ही हे लक्षात घेतले पाहिजे, मी की इमारतीच्या दुसऱ्या टोकाला होतो. भिंती जाड आहेत. त्यामुळे कुठलाही आवाज येणे शक्य नव्हते.”

पायरोने मान हलवली.

ॲस्टवेलने चालू ठेवले, “मी त्याला विचारले, की त्याला अंथरुणापर्यंत पोचायला काही मदत हवी आहे का? पण तो नको म्हणाला व त्याच्या खोलीपर्यंत स्वतःच गेला व दार ढकलले. मग मी कपडे काढून झोपायला गेलो.

पायरो गालीच्याकडे रोखून बघत होता. शेवटी तो म्हणाला, “तुमच्या हे लक्षात आले असेल, की तुमचे हे सांगणे फार महत्वाचे आहे.”

“मी समजतो, की निदान --- म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

पुढचे दार वाजल्यापासून दहा मिनिटांनी लिव्हरसन जिन्यावर परत जातांना दिसला, हा पुरावा महत्वाचा आहे. मला समजल्याप्रमाणे, तो स्वतः असे म्हणतो आहे, की तो घरी आला आणि सरळ झोपायला गेला. पण याशिवाय अजून काही आहे. ॲस्टवेल बाईसाहेबांचे सचिवाला दिलेले शिव्याशाप मजेशीर आहेत. मी कबूल करतो, की आतापर्यंत हे सिद्ध करणे अवघड आहे. तुमच्या या सांगण्यामुळे, पुरावा तयार झाला.”

“कसा काय?”

ॲस्टवेल बाईसाहेब म्हणतात, की पावणेबारा वाजता त्या नवऱ्याच्या खोलीतून निघाल्या. सचिव म्हणतो, तो अकरा वाजता झोपला. त्याने खून केला असण्याची शक्यता असलेला वेळ म्हणजे पावणेबारा ते चार्ल्स लिव्हरसन परतेपर्यंतचा वेळ. आता तुम्ही म्हणता त्याप्रमाणे, तुम्ही दार उघडे टाकून बसला होता. तो त्याच्या खोलीतून बाहेर आला, तेव्हा तुम्हाला तो न दिसणे शक्यच नव्हते.”

दुसऱ्याने कबूल केले, “हो. तसे होते.”

“दुसरा जिनाही नाही?”

“नाही. मनोऱ्याच्या खोलीतून खाली जायला कुणालाही माझ्या खोलीवरूनच जावे लागते आणि तो तर गेला नाही. मला त्याची खात्री

आहे. मिस्टर पायरो, काही झाले तरी मी आता म्हणालो त्याप्रमाणे, मी खात्रीने सांगतो, की तो मनुष्य पार्सन्ससारखाच शांत आहे.”

पायरो समजावणीच्या सुरात म्हणाला, ““‘हो पण, हो पण, मला ते सर्व समजले.” तो थांबला. “तुम्ही तुमच्या सर रुबेनबरोबरच्या भांडणाचे कारण सांगितले नाही?”

दुसऱ्याचा चेहरा लाल झाला. “तुम्हाला माझ्याकडून काही कळणार नाही.”

पायरो छताकडे बघत होता. “जिथे बाईचा संबंध येतो, तिथे मी नेहमी काळजी घेतो.”

व्हिक्टर ॲस्टवेल उभा राहिला. “तुमचा धिःकार असो. तुम्ही --- तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

पायरो म्हणाला, “मी मिस लीलीबद्दल विचार करत होतो.”

व्हिक्टर ॲस्टवेल एकदोन मिनिटे गोंधळून उभा राहिला. त्याचा रंग उतरला. तो परत बसला. “माझ्यासाठी तुम्ही फारच हुशार आहात, मिस्टर पायरो. हो लीलीवरुन आमचे भांडण झाले. त्याला लिली आवडत नसल्याने तो तिला त्रास देत असे. तो तिच्याबद्दल काहीतरी खुसपटे काढत असे --- चुकीची किंवा काहीशी तशीच. माझा त्यापैकी कशावरच विश्वास नाही.

आणि मग तो त्याची मर्यादा सोडून अजून पुढे गेला. तो तिने रात्री चोरी केली असे म्हणू लागला. ती रात्री कुणाला भेटायला बाहेर जाते, असे म्हणू लागला. अरे देवा! मी त्याला सांगितले याहून कमी वाईट

बोलल्याबद्दल लोकांना ठार करण्यात आलेले आहे. तेव्हा तो गप्प झाला. मी जायला निघालो, तेव्हा रुबेन मला थोडा घाबरलेला दिसत होता."

पायरो नम्रपणे पुटपुटला, "मला याचे क्वचितच नवल वाटेल."

व्हिक्टर वेगळ्या आवाजात म्हणाला, "मी लीलीबद्दल खूप विचार करतो. ती अगदी चांगली मुलगी आहे."

पायरोने काही उत्तर दिले नाही. तो समोर बघत होता. पण विचारात हरवून गेला होता. तो त्याच्या विचारातून एकदम धक्का बसल्यासारखा बाहेर आला.

"मला वाटते, मी थोडे चालले पाहिजे. इथे एक हॉटेल आहे ना?"

व्हिक्टर म्हणाला, "दोन आहेत. मिट्रे स्टेशनजवळ आहे आणि गोल्फ हॉटेल गोल्फच्या मैदानात आहे.

पायरो म्हणाला, "आभारी आहे. हो, नक्कीच मला थोडे चालले पाहिजे."

गोल्फ हॉटेल नावाप्रमाणेच गोल्फच्या मैदानावर क्लबहाउसजवळ उभे होते. इथेच तो पूर्वी आला होता. मागे केव्हातरी त्याने शेजारील खानावळीची दुरुस्ती केली होती व त्याची जाहिरात केली होती. तो इथे तो चालणार होता. त्या छोट्या माणसाकडे त्याच्या स्वतःच्या पद्धती होत्या. तीन मिनिटांनंतर तो गोल्फ हॉटेलमध्ये शिरत होता. तेथील व्यवस्थापिका मिस लॅंगडॉनबरोबर त्याने खासगी सल्लामसलत केली.

पायरो म्हणाला, "बाईसाहेब, तुमची थोडी गैरसोय केल्याबद्दल, मला खंत आहे. पण तुम्हाला माहिती आहे का, मी गुप्तहेर आहे."

त्याला नेहमी साधेपणा आवडत असे. या केसमध्ये, त्याची पद्धत लगेच यशस्वी झाल्याचे सिद्ध झाले.

मिस लॅगडॉन उद्गारली, “एक गुप्तहेर!”

पायरोने तिला दिलासा दिला, “स्कॉटलंड यार्डमधून मी आलेलो नाही. खरे तर ते तुम्हाला जाणवले का? मी इंग्लिशमन नाही. नाही. मी सर रुबेन ॲस्टवेलच्या खुनाची खासगी चौकशी करतो आहे.”

मिस लॅगडॉन त्याच्याकडे नवलपूर्णतेने बघत अपेक्षित असल्यासारखे म्हणाली, “आता तुम्ही काही बोलू नका.”

पायरो हसत म्हणाला, ”फक्त गुप्त गोष्टी न फोडणाऱ्या तुमच्या सारख्या व्यक्तीजवळच, मी सत्य उघड करतो. मला वाटते, तुम्ही मला मदत करू शकाल. खुनाच्या दिवशी रात्री इथे कुणी माणूस रहायला होता का, जो त्यावेळी इथे नव्हता पण बारा साडेबाराला परत आला?”

मिस लॅगडॉनचे डोळे आणखीनच मोठे झाले. ती श्वास रोधून बोलली, “तुम्हाला वाटत नाही ना की --- ?”

“की इथे खून झाला? नाही. पण मला अशी शंका आहे, की इथे रहाणारा कुणी पाहुणा त्या रात्री, मॉन रेपोसच्या दिशेने चालत गेला आणि असे असेल, तर त्याने काही पाहिले असेल, जे त्याला काही समजले नसेल. पण ते माझ्या दृष्टीने उपयुक्त असेल.”

व्यवस्थापिकेने शहाणपणे डोके हलवले. ती गुप्तहेराच्या तर्कशास्त्रातील घटनांचे महत्व चांगले जाणणारी होती. “मला चांगले समजले. आता मी बघते, की त्या दिवशी आमच्याकडे कोणकोण रहात होते?”

तिच्या मनात नावे आठवत, बोटांच्या ठशांच्या स्मृतीला प्रासंगिकतेची जोड देत, ती हसली.

कॅप्टन स्वान, मिस्टर एल्किन्स, मेजर ब्लयन्ट, म्हातारा मिस्टर बेन्सन, नाही खरे तर, सर, मला नाही वाटत यापैकी कुणी त्या रात्री बाहेर चालायला गेले."

"कुणी गेले असते, तर तुमच्या लक्षात आले असते, नाही का?"

"हो, सर. हे नेहमीचे नाही. असे बघा, येथील पाहुणे जेवायला बाहेर जाणे, एवढेच इथे होऊ शकते. पण जेवणानंतर ते सहसा कुठे जात नाहीत. इथे आसपास जाण्यासारखे काय आहे, नाही का?"

ॲबॉट क्रॉसचे आकर्षण गोल्फ आणि गोल्फ सोडून काहीच नव्हते. पायरोने ते मान्य केले, "तसे आहे. पण तुम्हाला जेवढे आठवते, तेवढ्यावरून त्या रात्री कुणी बाहेर गेले नाही?"

"कॅप्टन इंग्लंड आणि त्याची बायको जेवायला बाहेर गेले होते."

पायरोने डोके हलवले. "मला तसे काही नको आहे. मी दुसऱ्या हॉटेलात प्रयत्न करतो. त्याचे नाव मिट्रे आहे, बरोबर?"

मिस लॅगडॉन बोलली, "ओहो, मिट्रे, अर्थात, कोणी तिकडून चालायला बाहेर पडले असू शकेल." तिचा स्वर जरी थंड आणि गोंधळाचा असला, तरी सहज समजणारा होता आणि पायरोने तेथून पलटी मारली.

दहा मिनिटाने हेच दृष्य परत मिट्रे हॉटेलच्या, बोलायला थोडी विचित्र असलेल्या, मिस कोलेबरोबर चाललेले तुम्हाला दिसले असते. ते जास्त भपका नसलेले कमी किमती असलेले, स्टेशनजवळचे हॉटेल होते.

"त्या रात्री एक गृहस्थ रात्री उशीरा बाहेर गेला होता. मला आठवते, त्याप्रमाणे, तो साडेबाराच्या सुमाराला परत आला. त्या वेळेला चालायला जायची त्याची सवय होती. त्याने ते त्यापूर्वीदेखील एकदोन वेळा केले होते. त्याचे नाव काय होते, ते मी बघते. क्षणभर थांबा. मला ते आठवत नाही."

तिने जाड रजिस्टर काढले आणि त्याची पाने उलटू लागली. "एकोणीस, वीस, एकवीसावे, बाविसावे. आहा, इथे ते आहे. कॅप्टन हम्फ्री नायलोर."

"तो पूर्वी इथे राहिला होता का? तुम्ही त्याला चांगले ओळखता का?"

मिस कोले म्हणाली, "यापूर्वी एकदा. पंधरवड्यापूर्वी. तेव्हाही तो असाच बाहेर गेलेला मला आठवते."

"तो गोल्फ खेळायला आला होता का?"

"मला वाटते, हो. बहुतेकजण इथे त्यासाठीच येतात."

पायरो म्हणाला, "खरे आहे. बाईसाहेब, मी तुमचा आभारी आहे. तुम्हाला शुभ दिवस."

फार विचारदर्शक चेहरा करून, तो मॉन रेपोसला परत गेला. एकदोनदा त्यने खिशातून काहीतरी काढून पाहिले. तो स्वतःशी पुटपुटला, "हे केले पाहिजे. मला संधी मिळाली, की लगेच, अगदी लगेच."

पुन्हा घरात शिरल्यावर, पार्सन्सला त्याने विचारले की मिस लिली कुठे सापडेल. त्याला असे सांगितले गेले की ती लहान अभ्यासिकेत, ॲस्टवेल बाईसाहेबांनाचा काही पत्रव्यवहार बघते आहे. हे ऐकून, पायरोचे समाधान झालेले दिसले. त्याला लहान अभ्यासिका शोधायला काही त्रास

झाला नाही. तिथे लिली खिडकीजवळील टेबलावर लिहित बसलेली होती. खोली रिकामी होती. त्याच्यामागे पायरोने काळजीपूर्वक दार लावले आणि मुलीकडे आला.

"बाईसाहेब, मला तुमचा थोडा वेळ मिळेल का?"

"नक्कीच." लीलीने कागदपत्रे बाजूला ठेवली व ती त्याच्याकडे वळली.

"मी तुमच्यासाठी काय करू शकते?"

"खून झाला त्या रात्री, ॲस्टवेल बाईसाहेब त्यांच्या नवऱ्याकडे गेल्या, तेव्हा तुम्ही सरळ झोपायला गेलात, बरोबर?"

लीलीने मान हलवली.

"तुम्ही परत काही कारणाने खाली आला नाहीत?"

मुलीने डोके हलवले.

"तर मग त्या दिवशी रात्री तुम्ही केव्हाही मनोऱ्याच्या खोलीत गेला नव्हतात, असे तुम्ही म्हणालात ना?"

"मला असे काही म्हटलेले आठवत नाही. पण ते खरे आहे. मी मनोऱ्याच्या खोलीत गेले नव्हते."

पायरोने त्याच्या भुवया चढवल्या. तो पुटपुटला, "हे वेगळे वाटते आहे."

"म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे आहे?"

"फारच वेगळे वाटते आहे. मग तुम्ही याबद्दल काय म्हणाल?"

त्याने त्याच्या खिशातून, डाग पडलेला लहानसा हिरवा शिफॉनचा तुकडा काढला आणि मुलीला बघण्यासाठी, तो उंच धरला.

तिचे हावभाव बदलले नाहीत. पण तिने जास्त जोराने श्वास आत घेतल्याचे त्याला जाणवले.

“मिस्टर पायरो, मला कळत नाही.”

“मला समजल्याप्रमाणे, त्या रात्री तुम्ही परिधान केलेल्या हिरव्या शिफॉनचा ड्रेसचा तुकडा --- हा --- “ त्याने तो चिमटीत धरला होता. “त्याचा फाटका तुकडा.”

मुलीने कडकपणे विचारले, “आणि तो तुम्हाला मनोऱ्याच्या खोलीत सापडला? असे कसे झाले?”

पायरो सिलिंगकडे बघत राहिला. “क्षणभर आपण असे समजू --- की तो तिथे सापडला.”

प्रथमच मुलीच्या डोळ्यात भीती उमटलेली दिसली. तिने बोलायला सुरवात केली, मग पुन्हा स्वतःला सावध करून तपासून बघितले. पायरोने तिचे छोटे गोरे हात टेबलाच्या कडांना घट्ट दाबून ठेवलेले पाहिले.

ती विचारपूर्वक बोलली, “त्या संध्याकाळी मी मनोऱ्याच्या खोलीत गेले होते का? म्हणजे मला म्हणायचे आहे --- जेवणापूर्वी --- पण मला असे वाटत नाही. माझी खात्री आहे, मी गेले नव्हते. जर तो हिरवा तुकडा तिथे पडलेला होता, तर तो पोलिसांना कसा मिळाला नाही? त्यामुळे मला हे काही असामान्य वाटते आहे.”

तो छोटा माणूस म्हणाला, “हर्क्युल पायरो जसा वस्तूंचा विचार करतो, तसा, पोलीस करत नाहीत.”

लिली बोलली, “मी तिथे जेवणापूर्वी किंवा आदल्या दिवशी रात्री एका मिनिटाकरता गेले असेन. मी तेव्हा तो ड्रेस घातला होता. हो मला आठवते आहे, मी आदल्या रात्री गेले होते.”

पायरो म्हणाला, मला तसे वाटत नाही.”

“का?’

त्याने सावकाशीने या बाजूपासून त्या बाजूपर्यंत फक्त डोके हलवले.

मुलगी कुजबुजली, “तुम्हाला काय म्हणायचे आहे?” ती त्याच्याकडे बघत पुढे झुकली होती. चेहऱ्याचा रंग उडाला होता.

“बाईसाहेब, तुम्हाला दिसत नाही का, या तुकड्यावर डाग पडले आहेत? याबद्दल काही संशय नाही की ते डाग मानवी रक्ताचे आहेत.”

“तुम्हाला असे म्हणायचे आहे --- “

“हो. तसेच म्हणायचे आहे, की खून झाल्यावर, आधी नव्हे, तुम्ही मनोऱ्याच्या खोलीत गेला होतात. तुम्ही सगळे खरेखरे मला सांगितलेत, तर बरे होईल. नाहीतर तुमच्यावर वाईट संकट कोसळेल.”

ती माणसाची छोटी कडक आकृती मुलीकडे चापेकळी रोखून शिव्याशाप देत, उभी राहिली.

लिली धापा टाकत म्हणाली, “तुम्ही हे कसे शोधून काढले?”

बाईसाहेब, त्याचे एवढे काही नाही. मी तुम्हाला सांगतो, हर्क्युल पायरोला माहिती असते. मला. कॅप्टन हम्फ्री नायलोरबद्दलही सारे काही

माहिती आहे. तुम्ही त्या रात्री त्याला भेटायला गेलात, हेदेखील मला माहिती आहे.”

लीलीने अचानक तिचे डोके तिच्या दंडांवर ठेवले आणि तिला हुंदका फुटून अश्रू वाहू लागले. ताबडतोब पायरोने त्याचा दृष्टीकोन बदलून, तो विषय सोडून दिला.

तिला खांद्यावर थोपटत तो म्हणाला, “अग, अग मुली, दुःख करू नकोस. हर्क्युल पायरोला फसवणे अवघड आहे, हे तुला एकदा समजले, की तुझा सगळा त्रास संपेल. आता तू मला सगळी गोष्ट सांग. म्हाताऱ्या पपा पायरोला तू सर्व काही सांगशील ना?”

“तुम्हाला वाटते, तसे ते नाही. खरेच. हम्फ्रे --- माझा भाऊ --- त्याने सर रुबेनच्या केसालाही धक्का लावलेला नाही.”

पायरो म्हणाला, “तुझा भाऊ? म्हणजे असे आहे तर! ठीक आहे तुला त्याला संशयापासून वाचवायचे असेल, तर तू काहीही हातचे न राखता, सगळी गोष्ट मला सांगितली पाहिजेस.” तिचे कपाळावर आलेले केस मागे सारत, लिली पुन्हा बसली. एकदोन मिनिटांनी तिने स्पष्टपणे, हळू आवाजात बोलायला सुरवात केली.

“मिस्टर पायरो, मी तुम्हाला खरे सांगते. मला कळून चुकले आहे, की इतर काहीही करणे मूर्खपणा ठरेल. माझे खरे नाव लिली नायलोर आहे. हम्फ्री माझा एकुलता एक भाऊ आहे. काही वर्षांपूर्वी, तो जेव्हा आफ्रिकेत होता, तेव्हा त्याला एका सोन्याच्या खाणीचा शोध लागला. किंवा मी असे म्हणेन, की त्याला सोन्याचा शोध लागला. मी तुम्हाला याचा काही भाग

व्यवस्थित सांगू शकत नाही, कारण मला तांत्रिक महत्वाच्या गोष्टी समजत नाहीत. पण काय झाले ते असेः

ही मोठी जबाबदारी अंगावर घेण्याची गोष्ट होती. हम्फ्री सर रुबेनच्या नावाने पत्रे घेऊन घरी आला. त्याला आशा होती, की त्याना यात, मापला गोल्ड फिल्ड कंपनीमध्ये, रुची निर्माण होईल. मला यातले बरोबर काय, ते अजून कळत नाही. पण सर रुबेनने एका सक्षम माणसाला अहवाल देण्यासाठी पाठवले. त्यानुसार सर रुबेनने माझ्या भावाला सांगितले, की त्या माणसाचा अहवाल नकारात्मक होता व हम्फ्रेने मोठी चूक केली आहे. माझा भाऊ परत आफ्रिकेला अंतर्गत मोहिमेवर गेला. आणि ती जागा हरवून बसला. असे गृहीत धरले गेले, की तो आणि त्याची मोहीम गाळात गेली.

त्यानंतर लगेच मापला गोल्ड फिल्डची धूळदाण उडवण्यासाठी एक कंपनी निघाली. जेव्हा माझा भाऊ इंग्लंडला परत आला तेव्हा तो झटपट या निर्णयाला आला, की गोल्ड फिल्ड ही त्याने शोध लावलेली कंपनीशी मिळतीजुळती होती. सर रुबेन ॲस्टवेल याचे त्या कंपनीशी काहीच देणेघेणे नव्हते. आणि त्यांनी स्वतःहून ती जागा शोधून काढली होती. पण माझ्या भावाचे समाधान झाले नाही. त्याची खात्री होती, की सर रुबेनने त्याला जाणूनबुजून फसवले.

याबाबत तो अधिकाधिक आक्रमक व असमाधानी होऊ लागला. मिस्टर पायरो, या जगात आम्ही दोघे एकटेच होतो. मला माझ्यासाठी पैसे मिळवणे भाग होते. सर रुबेन आणि मापला गोल्ड फिल्ड्स यांचे काही संबंध आहेत का हे शोधून काढण्यासाठी, मी सर रुबेन यांच्याकडे घरगुती स्वरूपाची नोकरी करायचे ठरवले. मी कोण आहे, हे त्यांना कळू नये म्हणून

मी माझे खरे नाव लपवले. मी कबूल करते, की मी त्यासाठी बेकायदेशीरपणे काही संदर्भ शोधले.

त्या जागेसाठी भरपूर अर्ज आले होते. माझ्यापेक्षा जास्त शिकलेल्या लोकांचे अर्जही त्यात होते. म्हणून --- मिस्टर पायरो, मी अमेरिकेला गेलेल्या पर्थशायरच्या राणीसाहेबांतर्फे एक सुंदर अर्ज लिहीला. माझा अंदाज होता, की त्या राणीसाहेबांचा ॲस्टवेल बाईसाहेबांवर चांगला प्रभाव पडेल. माझा अंदाज खरा ठरला. तिने मला ताबडतोब नोकरी दिली.

तेव्हापासून मी इथे द्वेषपूर्ण रीतीने हेरगिरी करते आहे. आणि अजूनपर्यंत मला यश मिळालेले नाही. सर रुबेन हे त्यांच्या व्यवसायाची गुप्तता राखणारे आहेत. पण जेव्हा व्हिक्टर ॲस्टवेल आफ्रिकेहून इथे आले, तेव्हा ते एवढे नेमकेपणे बोलणारे नसल्याने मला असा विश्वास वाटू लागला, की शेवटी हम्फ्रेची काही चूक वा गैरसमज झालेला नव्हता. माझा भाऊ खून होण्यापूर्वी पंधरा दिवस इथे आला. मी चोरून घराबाहेर पडून, त्याला रात्री भेटले. मी त्याला व्हिक्टर ॲस्टवेल काय म्हणाला, ते सांगितले. तो फार उद्दीपित झाला. तो मला म्हणाला, की मी योग्य रस्त्यावर आहे.

पण त्यानंतर सर्व चुकीचे होऊ लागले. कोणीतरी मला घरात चोरी करतांना पाहिले व त्याची सर रुबेनना बातमी दिली. त्यांना संशय आला आणि त्यांनी माझी शिकार केली. लवकरच त्यांना समजले, की ते संदर्भ बेकायदेशीरपणे चोरले गेले आहेत. हे खुनाच्या दिवशी झाले. त्याना वाटले, की मी त्यांच्या बायकोच्या रत्नांच्या मागे आहे. त्यांचे जे काही संशय होते, त्यामुळे त्याना मला मॉन रेपोस येथील नोकरीतून काढून टाकायचे होते. तरी त्यांनी माझ्यावर कोर्टात केस न करण्याचे ठरवले. ॲस्टवेल बाईसाहेबांनी

माझ्याविरुद्ध पवित्रा घेतला व त्या सर रुबेनच्या मागे ठामपणे उभ्या राहिल्या.”

ती थांबली. पायरोचा चेहरा थंड पडला होता. तो म्हणाला, “आणि आता आपण खुनाच्या रात्रीकडे येत आहोत.”

लीलीने कसाबसा आवंढा गिळला आणि डोके हलवले.

“मिस्टर पायरो, सुरवातीला मला सांगितले पाहिजे, माझा भाऊ परत आला होता. मी परत एकदा चोरून बाहेर पडले व त्याला भेटले. मी सांगितल्याप्रमाणे, माझ्या खोलीत गेले, पण झोपायला गेले नाही. त्याऐवजी, मी सगळेजण झोपी जाईपर्यंत थांबले. माझ्या खोलीतील कडेच्या दरवाज्याने खालच्या मजल्यावर गेले. मला हम्फ्रे भेटला. मी त्याला थोडक्यात काय झाले आहे, ते सांगितले. मी त्याला सांगितले की मला असे वाटते आहे, की त्याला हवी असलेली कागदपत्रे सर रुबेन यांच्या तिजोरीत, मनोऱ्याच्या खोलीत आहेत. त्या रात्री आम्ही ती मिळवायचे शेवटचे धाडस करायचे ठरवले आणि त्या रात्री ती मिळवली.

मी आधी जाऊन रस्ता सुरक्षित आहे ना, हे बघायचे ठरवले. मी त्याच जिन्याने परत जात असतांना, चर्चच्या घड्याळात बारा वाजल्याचे ऐकले. मी मनोऱ्याच्या खोलीकडे जाणारा अर्धा जिना चढले, तेव्हा मी काही पडत असल्याचा जोराचा आवाज ऐकला. एक आवाज ओरडला, “अरे देवा! एकदोन मिनिटांने, मनोऱ्याच्या खोलीचे दार उघडले आणि चार्ल्स  लिव्हरसन बाहेर आला. मला चंद्रप्रकाशात त्याचा चेहरा स्पष्ट दिसला. पण मी त्याच्याखाली जिन्यात जिथे अंधार होता, तिथून चालले होते. त्यामुळे त्याने मला मुळीच पाहिले नाही.

तो तिथे त्याच्या पायांवर डगमगत क्षणभर उभा राहिला. तो भीतीदायक दिसत होता. तो काही ऐकत असल्यासारखे वाटत होते. नंतर मोठ्या प्रयत्नाने त्याने स्वतःला सावरले आणि मनोऱ्याच्या खोलीचे दार उघडून, तिथे काही त्रासदायक झाले नसल्याचे, काहीतरी ओरडला. त्याचा आवाज अगदी आत्मविश्वासपूर्ण व आनंदी येत होता. पण चेहरा ते खोटे असल्याचे दर्शवत होता. मिनिटभर तो थांबला मग वर जाऊन दिसेनासा झाला.

तो जेव्हा गेला, तेव्हा मिनिटभर थांबून, मी मनोऱ्याच्या खोलीच्या दाराकडे सरकत गेले. काही शोकाकुल करणारी गोष्ट झाली असावी, असे मला वाटत होते. मोठा दिवा बंद होता पण टेबलावरचा दिवा चालू होता. त्या प्रकाशात मला सर रुबेन टेबलाशेजारी जमिनीवर पडलेले दिसले. मला कसे काय धैर्य झाले माहिती नाही, पण मी कशीबशी आत जाऊन त्यांच्याशेजारी गुडघे टेकून बसले. मला ते जिवंत नसल्याचे लगेच समजले. त्याना मागून ढकलले गेले होते. ते नुकतेच मृत्यू पावलेले दिसत होते. मी त्यांच्या हाताला हात लावला तो अजून कोमट होता. मिस्टर पायरो, हे फार भयंकर होते, फार भयंकर!"

ते आठवून तिच्या अंगावर शहारा आला.

तिच्याकडे नीट बघत पायरो म्हणाला, "मग पुढे?"

लीलीने मान हलवली.

"मिस्टर पायरो, "हो. तुम्ही काय विचार करत आहात, मला माहिती आहे. मी जोरात ओरडून घर जागे का केले नाही? मला माहिती आहे, मी तसे करायला हवे होते .पण तिथे गुडघ्यांवर बसल्याबसल्या क्षणार्धात

माझ्या लक्षात आले, माझे सर रुबेनशी असलेले भांडण, माझे चोरून हम्फ्रेला भेटायला जाणे, दुसऱ्या दिवसापासून मला नोकरीत मिळणार असलेला डच्चू, हे सगळे माझ्या नजरेसमोरून तरळत गेले. हे सगळे असे सांगत होते, की मी हम्फ्रेला आत घेतले आणि त्याने सूड घ्यायचा म्हणून सर रुबेन यांना ठार मारले. जर मी सांगितले असते, की मी चार्ल्स लिव्हरसनला खोलीतून बाहेर पडतांना पाहिले, तर कोणी माझ्यावर विश्वास ठेवला नसता.

“मिस्टर पायरो, ते भयानक होते. मी तिथे गुडघ्यांवर बसल्याबसल्या खूप विचार केला. मी जितका जास्त विचार करत गेले तितके माझे अवसान गळू लागले. सर रुबेनच्या खिशातून मी किल्ल्या गळून पडलेल्या पाहिल्या. त्यात तिजोरीची किल्ली होती. ती उघडण्याचा गुप्त शब्द मला आधीच माहिती होता. कारण ॲस्टवेल बाईसाहेबांनी मागे त्याचा उल्लेख केलेला मी ऐकला होता. मिस्टर पायरो, मी तिजोरीकडे गेले. ती उघडली. आणि तिथे मला असलेली कागदपत्रे शोधू लागले.

शेवटी ती मला सापडली. हम्फ्रेचे म्हणणे बरोबर होते. सर रुबेन मापला गोल्ड फिल्ड्स कंपनीच्या मागे होते  आणि त्यांनी जाणूनबुजून हम्फ्रेला फसवले होते. त्यामुळे गोष्टी अजूनच वाईट झाल्या. त्यामुळे हम्फ्रेला गुन्हा करायला विशिष्ट कारण मिळाले असते. मी कागदपत्रे परत तिजोरीत ठेऊन दिली. त्याच्या दाराला किल्ली लावून ठेवली. मग माझ्या खोलीत गेले. सकाळी किल्ल्या मिळाल्यावर मी इतरांसारखेच आश्चर्यचकित झाल्याचे व भीती वाटल्याचे ढोंग केले.

ती थांबली व दयाद्रपणे पायरोकडे पाहिले.

“मिस्टर पायरो, मी जे सांगितले, त्यावर तुमचा विश्वास बसला का? कृपया तसे म्हणा.”

पायरो बोलला, “हो मी तुमच्यावर विश्वास ठेवतो. माझा गोंधळ होत होता, त्यावर तुम्ही चांगला प्रकाश टाकला. एका गोष्टीसाठी तुमचा खात्रीशीरपणा, की चार्ल्स लिव्हरसनने गुन्हा केला, आणि त्याचबरोबर तुमचे मला इथे आणण्याचे जे सततचे प्रयत्न केले, त्यामुळे गोष्टी बऱ्याच सुकर झाल्या.”

लीलीने मान डोलवली.

तिने मोकळेपणे कबूल केले, “मला तुमची भीती वाटत होती. मला माहिती होते ते, ॲस्टवेल बाईसाहेबांना माहिती नव्हते, की चार्ल्सने गुन्हा केला आहे. मी काही बोलू शकत नव्हते. मला वाटत होते, की तुम्ही ही केस घ्यायला नकार द्याल.”

पायरो कोरडेपणे म्हणाला, “तुम्हाला अर्थातच वाटणारी काळजी बघून, मी कदाचित तसे केले असते.

लीलीने त्याच्याकडे पटकन पाहिले तिचे ओठ थोडे थरथरत होते.

“मिस्टर पायरो, आता तुम्ही काय करणार?”

“तुमचा संबंध आहे त्याबद्दल काही नाही. मी तुम्ही सांगितलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवतो. पुढची पायरी म्हणजे मी लंडनला जाणार व इन्स्पेक्टर मिलरला भेटणार.”

लीलीने विचारले, “आणि त्यानंतर?”

“त्यानंतर आपण बघू.”

अभ्यासिकेबाहेर त्याने त्याच्या हातात धरलेल्या परत एकदा डाग पडलेल्या हिरव्या शिफॉनच्या तुकड्याकडे बघितले.

स्वतःशीच त्याने जे मिळवले त्याबद्दल समाधान व्यक्त करत तो पुटपुटला, "आश्चर्यकारक आहे."

गुप्तहेर इन्स्पेक्टर मिलरला हर्क्युल पायरोचे विशेष प्रेम नव्हते. स्कॉटलंड यार्डमधील छोट्या बेल्जियनच्या मदतीचे स्वागत करणाऱ्या लोकांपैकी तो नव्हता. पायरोचे थोडे जास्तच कौतुक केले जाते, असे त्याला वाटत असे. या केसमध्ये त्याला स्वतःबद्दल खात्री वाटत होती आणि त्याने पायरोचे हसत हसत अभिनंदन केले.

"तुम्ही ॲस्टवेल बाईसाहेबांसाठी हे काम केले का? ठीक आहे. तुम्ही खूप गोंधळाच्या परिस्थितीतून मार्ग काढला."

"मग आता तुम्हाला या केसविषयी काही संशय उरला नाही ना?

मिलर डोळे मिचकावत म्हणाला, "खुन्याला अगदी हातोहात पकडलेली, यापेक्षा जास्त चांगली कुठली केस नसेल."

"मिस्टर लिव्हरसनने कबुली दिली आहे, म्हणे?"

तो गुप्तहेर म्हणाला, "त्याने त्याचे तोंड गप्प ठेवले असते, तर बरे झाले असते. तो पुन्हा पुन्हा सांगतो, की तो सरळ त्याच्या खोलीत गेला आणि तिकडे तो कधीच गेला नाही. ही अगदी मूर्खपणाची गोष्ट आहे."

पायरो पुटपुटला, "हे नक्कीच पुराव्याच्या विरुद्ध आहे. हा तरुण मिस्टर लिव्हरसन तुला असे कसे काय सांगू शकतो?"

"अकलेच्या नावाने भोपळा असलेला तरुण मूर्ख!"

"कमकुवत व्यक्तिमत्व असलेला." इनस्पेक्टरने मान हलवली.

असा प्रकारचा तरुण मनुष्य असू शकतो, असा विचार कोणी क्वचितच करेल. तुम्ही ते कसे सांगाल --- असा गुन्हा करायची त्याची शामत तरी कशी झाली?”

इनस्पेक्टरने कबूल करत म्हटले, “आणि कहर म्हणजे, पण तुम्हाला म्हणून सांगतो, मी अशा गोष्टी पुष्कळ वेळा पाहिल्या आहेत. एखादी अशक्त, परांगदा झालेल्या तरुण मनुष्याला अती पेय प्यायला लावा आणि काही काळ तुम्ही त्याला अग्निभक्षण करायला लावू शकता. कोपऱ्यातील अशक्त मनुष्य हा बळकट माणसापेक्षा अधिक धोकादायक असू शकतो.”

“तुम्ही म्हणता, ते खरे आहे. हो. खरे आहे.”

मिलर अजून थोडा वेळ ताठ राहिला.

“मिस्टर पायरो, तुमच्यासाठी हे ठीक आहे. तुम्हाला तुमची फी मिळते. त्यामुळे तुम्हाला त्या बाईच्या समाधानासाठी अर्थात पुरावा तपासायचे ढोंग करावे लागते. मला ते समजते.”

पायरो पुटपुटला व चालू पडला, “तुम्हाला अशा रुचीपूर्ण गोष्टी समजतात.”

त्याची पुढची भेट लिव्हरसनच्या वकिलाशी होती. मिस्टर मेह्यू एक कोरडा, बारीक व काळजी घेणारा गृहस्थ होता. त्याने पायरोचे अलिप्तपणे स्वागत केले. पण पायरोकडे त्याचा स्वतःचा आत्मविश्वास वाढवण्याचे मार्ग होते. दहा मिनिटात दोघे मित्रत्वाने बोलू लागले.

पायरो म्हणाला, “तुम्हाला समजेल, मी या केसमध्ये निव्वळ मिस्टर लिव्हरसनच्या वतीने काम करतो आहे. तशी ॲस्टवेल बाईसाहेबांची इच्छा आहे. त्यांची खात्री आहे की तो गुन्हेगार नाही.”

मिस्टर मेह्यू निरुत्साहाने बोलले, "हो. हो. तसे असेल."

पायरोचे डोळे चमकले. त्याने सुचवले, "तुम्हाला कदाचित अॅस्टवेल बाईसाहेबांच्या मताला फारसे महत्व देत नसाल का?"

वकील कोरडेपणे म्हणाला, "उद्या त्या म्हणतील, की त्यानेच गुन्हा केला आहे."

पायरोने कबूल केले, की त्यांना काय वाटते, ते नक्कीच पुरावा होऊ शकत नाही. या गरीब बिचाऱ्या माणसाविरुद्ध केस चालवणे, हे दुष्टपणाचे आहे."

वकील बोलला, "तो पोलिसांना काय म्हणाला, ते दयनीय आहे. तो त्याच्या गोष्टीला चिकटून राहिला आहे, हे चांगले नाही.

पायरोने चौकशी केली, "हे तो तुमच्या सल्ल्याने करतो आहे का?"

मेह्यूने मान हलवली. "त्यामुळे सद्यस्थिती तसूभरसुद्धा बदलत नाही. तो नुसती पोपटपंची करतो आहे."

दुसरा विचारपूर्वक झटपट बोलला, "त्यामुळे तुमचा त्याच्यावरील विश्वास तो गमावून बसतो, हे नाकारू नका." हात वर करून, तो घाईने म्हणाला, "हे मला अगदी सरळसरळ दिसते आहे. तुमच्या मनात तुम्ही त्याला दोषी समजता. पण आता माझे ऐका. मी हर्क्युल पायरो, तुमच्यासमोर केस पेश करतो."

"हा तरुण मनुष्य घरी येतो. त्याने फार दारू ढोसलली आहे. त्यातही खूप वेळा इंग्लिश व्हिस्की आणि सोडा. तो तर्--- झाला आहे. अशा अवस्थेत तो स्वतःच्या किल्लीने दार उघडून घरात शिरतो आणि लडखडत

मनोऱ्याच्या खोलीत जातो. तो दाराकडे बघतो आणि मंद उजेडात काकांना टेबलावर वाकून बसलेले बघतो.

लिव्हरसन पिऊन तर्--- झाला आहे. अंगात शक्ती व आत्मविश्वास संचारला आहे. त्याला त्याच्या काकांबद्दल काय वाटते, ते तो त्यांना सांगतो आहे. उघडपणे आव्हान देतो आहे. अपमान करतो आहे. जितके काका काही प्रत्युत्तर देत नाहीत, तितके त्याला जास्त चेव चढतो आहे. तो तेच तेच परत परत बोलतो आहे. पूर्ण शांतता पसरते शेवटी काकांच्या शांततेने भीती निर्माण होते. तो काकांच्या जवळ जाऊन, त्याचा हात काकांच्या खांद्यावर टाकतो. त्याच्या स्पर्शाने काकांची आकृती चुरगळली जाते आणि लोळागोळा होऊन जमिनीवर पडते.

मग मिस्टर लिव्हरसन भानावर येतो. मोठा आवाज करत खुर्ची पडते. सर रुबेनवर तो वाकतो. काय झाले, हे त्याच्या लक्षात येते. त्याच्या हाताला काही गरम व लाल लागल्याचे त्याच्या लक्षात येते. मग तो विलाप करू लागतो. त्याच्या ओठातून आताच बाहेर पडलेले व घरभर पसरणारे रडू आठवून, तो अस्वस्थ होतो. यांत्रिकपणे तो खुर्ची उचलतो. मग घाईने दाराबाहेर पडून चाहूल घेतो. त्याला वाटते, की काही आवाज ऐकू येतो आहे. ताबडतोब, आपोआप तो उघड्या दारातून काकांशी बोलत असल्याचे ढोंग करतो.

आवाज थांबतो. त्याला समजते की खरे तर आवाज आलेलाच नसतो. आता सर्व शांत आहे. ती हळूच त्याच्या खोलीत जातो. आणि लगेच त्याला समजते, की आपण त्या रात्री काकांच्या खोलीत कधी गेलोच नव्हतो, असे ढोंग केल्यास किती चांगले होईल त्यामुळे तो तशी गोष्ट सांगतो. त्याला आठवते, की त्या वेळी पार्सन्सने त्याला काय ऐकू आले, ते

काही सांगितलेले नसते. पण जेव्हा तो ते सांगतो, तेव्हा आता काही बदलायला लिव्हरसनला फार उशीर झालेला असतो. तो मूर्ख आणि हट्टी आहे. तो त्याच्या गोष्टीला चिकटून रहातो. मिस्टर, मला सांगा, हे शक्य नाही का?"

वकील बोलला, "हो, तुम्ही ते अशा तऱ्हेने मांडले आहे, की ते शक्य असेल असे वाटते."

पायरो उठून उभा राहिला. तो म्हणाला, "तुम्ही लिव्हरसनला भेटून, मी आता तुम्हाला सांगितलेली गोष्ट त्याला सांगू शकता. ती खरी आहे की नाही, हे त्यालाच विचारा."

वकिलाच्या कार्यालयाबाहेर पायरोने टॅक्सी केली. त्याने चालकाला सांगितले, "३४८, हार्ले रस्ता."

पायरोचे लंडनला जाणे ॲस्टवेल बाईसाहेबांना नवलपूर्ण वाटले, कारण त्या छोट्या माणसाने तो तिथे कशासाठी जातो आहे, हे काही सांगितले नव्हते. चोवीस तासांनी तो जेव्हा परत आला, तेव्हा त्याला पार्सन्सकडून समजले, की ॲस्टवेल बाईसाहेबांना त्याला लवकरात लवकर भेटायचे आहे. पायरोला बाईसाहेब त्यांच्या खोलीत सापडल्या. त्या दिवाणवर पहुडल्या होत्या. त्यांचे डोके उशांवर उंच रेललेले होते. पायरो तिथे आला त्या दिवसापेक्षा त्या बऱ्याच आजारी आणि दमलेल्या दिसत होत्या.

"मिस्टर पायरो, तुम्ही परत आलात तर?"

"हो, बाईसाहेब."

"तुम्ही लंडनला गेला होतात?"

पायरोने मान हलवली.

ॲस्टवेल बाईसाहेब कडकपणे म्हणाल्या, "तुम्ही मला जात असल्याचे काही बोलला नाहीत."

"माफ करा, बाईसाहेब. मी चुकलो. मी तुम्हाला सांगायला हवे होते. ठीक आहे, पुढच्या वेळी."

थोड्या विनोदी अंगाने ॲस्टवेल बाईसाहेब म्हणाल्या, "तुम्ही परत तसेच कराल. पहिल्यांदा गोष्टी करायच्या आणि नंतर लोकांना सांगायच्या, असे तुमचे ब्रीद दिसते आहे."

पायरो डोळे चमकवत बोलला, "कदाचित बाईसाहेबांचेदेखील तेच ब्रीद दिसते आहे."

"आता आणि नंतर, कदाचित. तुम्ही लंडनला कशासाठी गेला होतात? मला वाटते, आता तुम्ही मला सांगू शकाल, नाही का?"

इन्स्पेक्टर मिलरबरोबर आणि हुशार मिस्टर मेह्यूबरोबर माझी मुलाखत होती."

ॲस्टवेल बाईसाहेबांचे डोळे शोधक नजरेने त्याच्या चेहऱ्यावरून फिरत होते. त्या सावकाश बोलल्या, "आणि आता --- तुम्ही विचार करत आहात?"

पायरो त्यांच्याकडे रोखून बघत होता. तो थंडपणे म्हणाला, "चार्ल्स लिव्हरसन निर्दोषी असण्याची शक्यता आहे."

ॲस्टवेल बाईसाहेब दोन उशा जमिनीवर पाडत, उठून उभ्या रहात म्हणाल्या, "आहा, म्हणजे माझे बरोबर होते. माझे बरोबर होते."

"बाईसाहेब, मी शक्यता आहे, असे म्हटले."

त्याचा सूर तिला चक्रावून गेला. तिने एक कोपर टेकवून स्वतःला उचलले आणि त्याच्याकडे भेदक नजरेने पाहिले. “मी काही करू शकते का?”

तो मान हलवत बोलला, “हो. तुम्ही मला सांगू शकता, की तुम्ही ओवेन ट्रेफुसीसवर संशय का घेता?”

“मी तुम्हाला आधीच सांगितले आहे, मला माहिती आहे, एवढेच.”

पायरो कोरडेपणे बोलला, “दुर्दैवाने तेवढे पुरेसे नाही. त्या रात्रीमध्ये तुमचे मन परत न्या आणि प्रत्येक बारीकसारीक तपशील आठवा. तुम्ही सचिवाचे काय निरीक्षण केले? मी हर्क्युल पायरो तुम्हाला सांगतो, काहीतरी निश्चित असणार.”

ॲस्टवेल बाईसाहेबांनी डोके हलवले. “मी त्या संध्याकाळी त्याला क्वचितच पाहिले. आणि मी नक्कीच त्याचा विचार करत नव्हते.”

“तुमच्या मनात काही दुसरे विचार चालू होते का?”

“हो”.

“तुमच्या नवऱ्याच्या मनात मिस लिली मार्ग्रेव्हविषयी वाईट मत असल्याचे विचार?”

ॲस्टवेल बाईसाहेब डोके हलवत म्हणाल्या, “ते बरोबर आहे. मिस्टर पायरो, तुम्हाला त्याबद्दल सर्व काही माहिती दिसते.”

तो छोटा मनुष्य जरा जास्तच अभिमानाने बोलला, “मी, मला सर्व काही माहिती आहे.”

“मिस्टर पायरो, मला लिली आवडते, ते तुम्ही पाहिलेले आहे. रुबेन तिच्यावर काही संदर्भांविषयी वा काही इतर कारणाने तिच्यावर चिखलफेक

करू लागला, तेव्हा मी असे म्हटले नाही, की तिने त्याला फसवले नाही. तिने फसवले. पण मी यापेक्षा जास्त वाईट गोष्टी यापूर्वी केल्या होत्या. नाटकी व्यवस्थापकांबरोबर काम करायचे म्हणजे तुम्हाला खूप प्रकारच्या युक्त्या कराव्या लागतात. माझ्या काळात मी लिहिले नाही, बोलले नाही, वा केले नाही, असे काही नव्हते.

“लिलीला हे काम हवे होते. तिने त्यासाठी पुष्कळ खोटेनाटे धंदे केले होते, हे तुम्हाला माहिती होते. अशा प्रकारच्या गोष्टींमध्ये पुरुष इतके मूर्ख असतात, की लिली बँकेत कारकून होऊन, त्याने नको इतके लक्ष देऊन केलेल्या लाखो पौंडांच्या कामात तिने गुप्तता राखली असती. मी संध्याकाळभर खूप काळजीत होते. कारण सहसा शेवटी रुबेन माझ्या आजूबाजूला असे. पण तेव्हा तो फारच मूर्खासारखा हट्टीपणा करत होता. बिचारा माझा रुबेन! त्यामुळे मला अर्थात सचिवाकडे, ट्रेफुसीसकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. त्याच्याकडे माझे फारसे लक्ष गेले नाही. तसेही तो फारसे लक्ष जाईल, असा नव्हता. तो तिकडे होता, एवढेच.”

पायरो म्हणाला, “मिस्टर ट्रेफुसीसबद्दल ती गोष्ट माझ्या लक्षात आली आहे. त्याचे व्यक्तिमत्व चमकत राहून, पुढे पुढे करणाऱ्यातले नव्हते. तो तुम्हाला राग आणत असे का?”

ॲस्टवेल बाईसाहेब म्हणाल्या, “नाही. तो व्हिक्टरसारखा नाही.”

“मी म्हणेन, मिस्टर व्हिक्टर, स्फोटक आहेत.”

ॲस्टवेल बाईसाहेब म्हणाल्या, “तो शब्द त्याच्यासाठी योग्य आहे. एखाद्या माहिती नसलेल्या फटाक्यासारखे तो घरभर स्फोटकपणे वावरत असतो.”

पायरोने सुचवले, “थोडा शीघ्रकोपी, असे म्हणता येईल का?”

ॲस्टवेल बाईसाहेब म्हणाल्या, “ओहो, तो चिडतो, तेव्हा तो पूर्णपणे राक्षसच होतो. पण मी मात्र त्याला घाबरत नाही. सगळे त्याच्यावर भुंकतात पण कोणीच त्याला चावत नाही.”

पायरो छताकडे बघत होता. तो पुटपुटला, “तुम्ही मला त्या संध्याकाळच्या सचिवाच्या वागण्याविषयी काही सांगू शकत नाही का?”

“मी तुम्हाला सांगते, मिस्टर पायरो, हा आतला आवाज आहे. एका बाईचा आतला आवाज आहे.”

“त्यामुळे कोणाला फाशी होऊ शकत नाही. आणि नेमकेपणे सांगायचे, तर ते एखाद्याला फाशीपासून वाचवूदेखील शकत नाही. ॲस्टवेल बाईसाहेब, तुम्हाला गंभीरपणे असे वाटत असेल, की मिस्टर लिव्हरसन निरपराध आहेत आणि तुमचा सचिवावरील संशय, बळकट पाया असलेला असा आहे, तर तुम्ही मला एक प्रयोग करायची परवानगी द्याल का?”

ॲस्टवेल बाईसाहेब संशयाने विचारत्या झाल्या, “कसल्या प्रकारचा प्रयोग?”

“तुम्ही तुमच्यावर संमोहनाचा प्रयोग करून घ्यायला तयार व्हाल का?”

“कशासाठी?”

पायरो पुढे झुकला. “जर मला सांगायचे असेल, की तुमची अंतःप्रेरणा काही नकळत ध्वनिमुद्रित केलेल्या गोष्टींवर आधारलेली आहे तर बहुधा तुम्ही संशयितच रहाल. मी फक्त एवढेच म्हणतो आहे, की मी

करत असलेला प्रयोग त्या चार्ल्स लिव्हरसन या दुर्दैवी माणसासाठी जास्त महत्वाचा असू शकेल. तुम्ही नकार देणार नाही ना?”

ॲस्टवेल बाईसाहेबांनी संशयाने विचारले, “मला संमोहित कोण करणार आहे? तुम्ही?”

“मी चुकत नसेन, तर माझा एक मित्र या क्षणी इथे येतो आहे. मला बाहेर गाडीच्या चाकांचा आवाज येतो आहे.”

“तो कोण आहे?”

“तो हार्ले रस्त्याचा डॉ काझालेट आहे.”

ॲस्टवेल बाईसाहेब काळजीने विचारत्या झाल्या “तो ठीक आहे का?”

“तो काही असातसा नाही. तुम्ही त्याच्या हातात अगदी सुखरूप आहात.”

ॲस्टवेल बाईसाहेब सुस्कारा टाकत म्हणाल्या, “ठीक आहे. हा सगळा वेडेपणा आहे. पण तुम्हाला ते काही उपयोगी वाटत असेल, तर करून बघू. मी तुम्हाला काही करण्यापासून रोकले, असे कोणी म्हणायला नको.”

“बाईसाहेब, मी तुमचा शतशः आभारी आहे.”

पायरो घाईने खोलीबाहेर पडला. काही मिनिटात, तो एका आनंदी, चष्मिस, गोल चेहऱ्याच्या छोट्या माणसाला घेऊन, आत आला. बाईसाहेबांच्या मनातील संमोहनकार म्हणून जे चित्र होते, त्यात तो बसत नव्हता. पायरोने त्याची ओळख करून दिली.

चांगल्या मनाने बाईसाहेब बोलल्या, तुम्ही हा वेडेपणा कधी सुरु करणार आहात?"

डॉक्टर म्हणाला, "ते अगदी सोपे आहे. फार सोपे. जरा रेलून बसा. हं अस्स --- बरोबर. अस्वस्थ होऊ नका."

बाईसाहेब बोलल्या, "मी अजिबात अस्वस्थ नाही. मला माझ्या इच्छेविरुद्ध कसे संमोहित केले जाते, हे बघायची माझी इच्छा आहे."

डॉक्टर काझालेट मोठ्याने हसला व आनंदाने बोलला, "हो, पण जर तुम्ही परवानगी दिली आहे, तर ते तुमच्या इच्छेविरुद्ध कसे काय होईल? हे बरोबर आहे. मिस्टर पायरो, तुम्ही तो दिवा बंद कराल का? बाईसाहेब, झोपी जा."

त्याने त्याची जागा थोडी बदलली. "तुम्ही उशीर करत आहात. तुम्हाला झोप आली आहे --- खूप झोप. तुमच्या पापण्या जड झाल्या आहेत. त्या मिटत आहेत. मिटत आहेत. मिटत आहेत. लवकरच तुम्हाला झोप लागेल --- "

त्याचा आवाज कमी कमी, शांतवणारा व एकसुरी होत गेला. आता तो थोडा पुढे झाला व हळूच बाईसाहेबांची उजवी पापणी उचलली. मग पायरोकडे वळून त्याने समाधानाने मान डोलवली.

तो हळू आवाजात म्हणाला, "सगळे व्यवथित झाले. आता मी पुढे जाऊ का?"

"हो, जरूर जा."

डॉक्टर कडकपणे व अधिकारवाणीने बोलला, “अॅस्टवेल बाईसाहेब, तुम्ही झोपला आहात. पण तुम्ही माझा आवाज ऐकू शकता आणि माझ्या प्रश्नांना उत्तर देऊ शकता.”

हालचाल न करणारी सोफ्यावरील आकृती पापणी न उचलता, हलक्या एकसुरी आवाजात बोलली, “मला तुमचा आवाज येतो आहे. मी तुमच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकते.”

“अॅस्टवेल बाईसाहेब, तुमच्या नवऱ्याचा खून झाला, त्या संध्याकाळी परत जा. तुम्हाला ती संध्याकाळ आठवते का?”

“हो.”

“तुम्ही जेवणाच्या टेबलाशी आहात. तुम्ही कायकाय पाहिले व तुम्हाला कायकाय जाणवले, ते सांगा.”

ती आकृती अस्वस्थपणे थोडीशी हलली. “मी खूप दुःखी आहे. मला लिलीची काळजी वाटते आहे.”

“आम्हाला ते माहिती आहे. तुम्हाला काय दिसले, ते मला सांगा.”

“व्हिक्टर सगळे खारवलेले बदाम खातो आहे. तो अधाशी आहे. उद्या मी पार्सन्सला सांगणार आहे, की ते टेबलाच्या कडेला ठेऊ नको.”

“पुढे सांगा.”

“आज रात्री रुबेन चांगल्या मनस्थितीत नाही. ते पूर्णपणे लिलीमुळे असेल, असे मला वाटत नाही. ते काही व्यवसायासंबधी आहे. व्हिक्टर त्याच्याकडे विचित्र पद्धतीने बघतो आहे.”

“आम्हाला मिस्टर ट्रेफुसीसबद्दल सांगा.”

“त्याच्या शर्टाचे डावे कफ झिजले आहेत. त्याने केसांना खूप तेल चोपडले आहे. मला वाटते माणसाने असे करू नये. त्यामुळे हॉलमधील उशा खराब होतात.”

काझालेटने पायरोकडे बघितले. पायरोने डोके हलवून काही सांगितले.

“जेवणानंतर तुम्ही कॉफी घेत आहात. त्या दृष्याचे वर्णन करा.”

“आज कॉफी छान झाली आहे. ती रोज वेगवेगळी असते. स्वयंपाकी त्याबाबतीत विश्वसनीय नाही. का, ते मला माहिती नाही. आता रुबेन खोलीमध्ये येतो. आज त्याची मनस्थिती फारच वाईट दिसते आहे. तो मिस्टर ट्रेफुसीसवर डाफरतो. शिव्यांची लाखोली वहातो. मिस्टर ट्रेफुसीसने त्याच्या हाताने पेपरसुरी धरली आहे. ती मोठी असून, त्याच्या पात्याची धार चाकूसारखी धारदार आहे. त्याच्या बोटांचा तळाचा भाग पांढरा आहे आणि त्याने तो किती घट्ट पकडला आहे! तो टेबलावर इतक्या जोराने दाबतो आहे, की टेबलाचा तेवढा भाग खरवडला जातो. तुम्ही कोणाला तरी भोसकायला धराल, तसा त्याने तो धरला आहे. ते दोघे बरोबर बाहेर पडतात. लीलीने तिचा हिरवा संध्याकाळचा ड्रेस घातला आहे. ती त्या ड्रेसमध्ये लिलीच्या फुलासारखी खूप छान दिसते. मला पुढील आठवड्यात आभ्रे धुवून घेतले पाहिजेत.”

ॲस्टवेल बाईसाहेब, फक्त एक मिनिट.”

डॉक्टर पायरोकडे वळला. तो पुटपुटला, “मला वाटते आपल्याला हवे ते मिळाले. पेपरसुरीच्या कृतीमुळे तिची खात्री पटली की सचिवानेच ते केले.”

“आपण आता मनोऱ्याच्या खोलीत जाऊ.”

डॉक्टरने मान हलवली व परत बाईसाहेबांना त्याच्या मोठ्या, फसव्या आवाजात प्रश्न विचारू लागला. “त्या दिवशी संध्याकाळी उशीरा, तुम्ही तुमच्या नवऱ्याबरोबर मनोऱ्याच्या खोलीत आहात. तुम्ही दोघे मिळून भयंकर दृष्य बघता, नाही का?”

पुन्हा आकृती अस्वस्थपणे हलली. “हो. भयंकर --- फार भयंकर! आम्ही भयानक गोष्टी बोललो --- दोघेही.”

आता त्याचे एवढे काही वाटून घेऊ नका. तुम्हाला खोली स्पष्ट दिसते आहे. पडदे ओढलेले आहेत. दिवे चालू आहेत.”

“मधला दिवा नाही, फक्त टेबलावरचा.”

आता तुम्ही नवऱ्याला शुभरात्र म्हणून जात आहात.”

“नाही. मी फारच चिडलेली आहे.”

“आता तुम्ही त्याला शेवटचे बघत आहात. लवकरच त्याचा खून होणार आहे. बाईसाहेब, त्याचा खून कुणी केला, ते तुम्हाला माहिती आहे का?”

“हो, मिस्टर ट्रेफुसीसने.”

“असे तुम्ही का म्हणता?”

“कारण फुगवटा --- पडद्यातील फुगवट्यामुळे.”

पडद्यात फुगवटा होता?”

“हो.”

“तुम्ही तो बघितला?”

“हो, मी त्याला हात लावला.”

“तिथे कुणी लपलेले होते का? ट्रेफुसीस?”

“हो.”

“तुम्हाला कसे माहिती?”

पहिल्यांदाच एकसुरी आवाज अडखळला आणि त्याने आत्मविश्वास गमावला. “मी --- मी --- पेपरसुरीमुळे.”

पायरो व डॉक्टरने एकमेकांकडे पाहिले.

“बाईसाहेब, मला कळत नाही. पडद्यात फुगवटा होता, असे तुम्ही म्हणालात का? तिथे कुणीतरी लपले होते? तुम्ही त्या व्यक्तीला पाहिले नाहीत?”

“नाही.”

“तुम्हाला तो ट्रेफुसीस वाटला, कारण आधी त्याने हातात पेपरसुरी धरली होती?”

“हो.”

“पण मिस्टर ट्रेफुसीस तर झोपायला गेले होते, बरोबर?”

“हो --- ते बरोबर आहे. तो त्याच्या खोलीत गेला होता.”

“त्यामुळे तो खिडकीच्या पडद्याच्या फुगवट्यामागे असू शकत नाही?”

“नाही. नाही. अर्थात नाही. तो तिथे नव्हता.”

“त्याने तुमच्या नवऱ्याला थोड्या वेळापूर्वी शुभरात्र म्हटले होते, नाही का?”

“हो.”

“आणि तुम्ही त्याला परत पाहिले नाही?”

“नाही.”

आता ती थरथरत, भानावर येत, थोडा शोक प्रगट करत होती.

डॉक्टरने म्हटले, “ती आता संमोहनातून बाहेर पडते आहे. मला वाटते, आपल्याला शक्य आहे, तेवढे आपण मिळवले आहे.

पायरोने मान हलवली. डॉक्टर ॲस्टवेल बाईसाहेबांवर वाकला. तो हळूच पुटपुटला, “तुम्ही चालत आहात. पुढच्या क्षणी तुम्ही डोळे उघडाल.”

ती दोन माणसे थांबली. ॲस्टवेल बाईसाहेब सरळ बसल्या आणि त्या दोघांकडे बघू लागल्या. “मला झोप लागली होती का?”

डॉक्टर म्हणाले, “हो, बाईसाहेब. एक लहानशी डुलकी.”

तिने त्याच्याकडे पाहिले. “तुमचे काय ते संमोहन --- की काय, तो वेडेपणाचा प्रयोग झाला का?”

डॉक्टर म्हणाले, “तुम्हाला काही वेगळे वाटत नसावे, अशी मी आशा करतो.”

ॲस्टवेल बाईसाहेबांनी जांभई दिली. “मला थोडे दमल्यासारखे वाटते आहे.”

डॉक्टर उठले. ते म्हणाले, “मी तुम्हाला कॉफी पाठवायला सांगतो. आता तुमचे काम पुरते झाले आहे.”

‘मी --- काही बोलले का?” ते दाराकडे गेल्यावर ॲस्टवेल बाईसाहेबांनी विचारले.

पायरो त्यांच्याकडे बघून हसला. “फार महत्वाचे काही नाही, बाईसाहेब. तुम्ही आम्हाला सांगितले, की हॉलमधील उशांचे आभ्रे धुवायला हवे आहेत.”

ॲस्टवेल बाईसाहेब म्हणाल्या, “ते करायला हवेच आहे. माझ्याकडून हे वदवून घेण्यासाठी, मला संमोहित करायची काही गरज नव्हती. ती चांगल्या भावनेने हसली. “आणखी काही?”

पायरोने विचारले, “मिस्टर ट्रेफुसीसने त्या रात्री हॉलमध्ये हातात पेपरसुरी धरल्याचे आठवते आहे का?

ॲस्टवेल बाईसाहेब म्हणाल्या, “मला माहिती नाही. मला खात्रीपूर्वक आठवत नाही. त्याने तसे केले असेल.”

“पडद्यातील फुगवट्याने तुम्हाला काही सुचवले का?”

ॲस्टवेल बाईसाहेब हसल्या. त्या सावकाश बोलल्या, “मला वाटते, मला काही आठवते आहे. नाही --- ते गेले, पण तरीही --- “

पायरो लगेच म्हणाला, “बाईसाहेब, काही त्रास करून घेऊ नका. ते महत्वाचे नाही --- काहीही महत्वाचे नाही.”

डॉक्टर पायरोबरोबर त्याच्या खोलीत गेले. डॉक्टर काझालेट म्हणाले, “यामुळे गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत. सर रुबेन सचिवावर नको ते आरोप करत होते. त्यामुळे सचिवाचा हात पेपरसुरीवर दाबला गेला. आणि उलटे उत्तर देण्यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी त्याला बराच प्रयत्न करावा लागला. लिलीच्या समस्येने ॲस्टवेल बाईसाहेबांचे जाणीवेचे मन

भरुन गेले होते. पण नेणीवेच्या मनाने चुकीच्या कृतींची जाणीवपूर्वक नोंद घेतली.

तिची पक्की खात्री झाली, की ट्रेफुसीसने सर रुबेनचा खून केला. आता आपण पडद्यातील फुगवट्याकडे येऊ. ते रुचीपूर्ण होते. तू जे सांगितलेस, त्यावरून मी असे समजलो, की मनोऱ्याच्या खोलीतील टेबल खिडकीजवळ होते. खिडकीला अर्थात पडदे लावलेले होते, नाही का?"

"हो, माझ्या मित्रा, काळे मखमलचे पडदे."

"खिडकीबाहेर पडद्यामागे गॅलरीत कुणाला लपायला जागा आहे का?"

"मला वाटते, अगदी थोडीशी जागा आहे."

डॉक्टर सावकाश म्हणाले, "मग अशी एक शक्यता आहे, की तिथे कोणीतरी लपून बसले होते. पण तो सचिव असू शकत नाही कारण दोघांनी त्याला खोली सोडतांना पाहिले. तो व्हिक्टर ॲस्टवेल पण नसणार. कारण ट्रेफुसीसला तो बाहेर पडतांना भेटला. ती लीलीदेखील नसणार त्या संध्याकाळी सर रुबेन तिथे शिरण्यापूर्वी कुणी लपून बसले असणार. त्या जागेचा नकाशा कसा होता, ते तू मला बऱ्यापैकी सांगितले आहेस. आता कॅप्टन नायलॉरचे काय? तिथे लपलेला तो होता का?"

पायरो म्हणाला, "हे नेहमी शक्य असते. त्याने हॉटेलमध्ये जेवण केले. पण तो किती वेळाने बाहेर पडला, हे ठरवणे अवघड आहे. तो हॉटेलमध्ये साडेबाराला परतला."

डॉक्टर म्हणाला, "मग तोच असेल. त्यानेच गुन्हा केला असेल. हातभर अंतरावर शस्त्र होते, हे कारणही मिळाले असेल. तरी तुला ही कल्पना फारशी पसंत पडलेली दिसत नाही?

पायरोने कबूल केले, "माझ्याकडे दुसऱ्या कल्पना आहेत. मला सांगा डॉक्टर, एक मिनिट असे धरु, की अॅस्टवेल बाईसाहेबांनी गुन्हा केला आहे. तर मग ती गोष्ट तिच्याकडून संमोहनात नक्कीच सांगितली गेली असती, नाही का?"

डॉक्टरने शीळ घातली.

"म्हणजे तू आता काय निष्कर्षावर पोचतो आहेस? अॅस्टवेल बाईसाहेब गुन्हेगार आहेत, असे? अर्थात --- हे शक्य आहे, मी या मिनिटापर्यंत असा विचार केला नव्हता. त्याला जिवंत बघणारी ती शेवटची होती. नंतर त्याला जिवंत कोणीच बघितले नाही. तुझ्या प्रश्नाला उत्तर म्हणून मला असे म्हणावेसे वाटते आहे, की --- जरी तिच्यावर संमोहनाचा प्रयोग केला, तरी ती मनाने खंबीर असल्याने, तिने तिच्या गुन्ह्याच्या सहभागाबद्दल काहीच सांगितले नाही. तिने माझ्या प्रश्नांची खरी उत्तरे दिली पण एका मुद्द्यावर ती गप्प होती. पण मिस्टर ट्रेफुसीसने सर रुबेनचा खून केला, यावर ती इतकी ठाम राहील, असे मला वाटले नव्हते."

पायरो म्हणाला, "मला वाटते, मी तिने खून केला, असे ठामपणे म्हणालो नाही. ती एक शक्यता आहे, एवढेच."

एकदोन मिनिटांने डॉक्टर म्हणाला, "ही रुचीपूर्ण केस आहे. चार्ल्स लिव्हरसन निष्पाप आहे असे धरले, तर कितीतरी शक्यता आहेत. अॅस्टवेल बाईसाहेब, हम्फ्रे नायलोर की लिली मार्ग्रेव्ह."

पायरो शांतपणे बोलला, “तुम्ही उल्लेख न केलेले अजूनही आहेत. त्याच्या स्वतःच्या गोष्टीप्रमाणे व्हिक्टर अ‍ॅस्टवेल त्याच्या खोलीत दार उघडे टाकून चार्ल्स लिव्हरसन परतण्याची वाट बघत बसला होता. पण फक्त त्याचे शब्द, एवढाच पुरावा आपल्याकडे आहे, समजले का?”

डॉक्टरने विचारले, “तो स्वभावाने वाईट मनुष्य आहे, नाही का? तूच मला असे सांगितले नाहीस का?”

पायरोने कबूल केले, “तसे आहे.”

डॉक्टर उठून उभा राहिला.”मला आता गेले पाहिजे. तू मला कळव की कशीकशी प्रगती होते आहे, कळवशील ना?”

डॉक्टर गेल्यावर पायरोने जॉर्जसाठी घंटी वाजवली. “मला कपभर माझे हर्बल पेय आण. मी दमलो आहे.”

जॉर्ज म्हणाला, ‘नक्कीच, सर. मी ते लगेच तयार करतो.”

दहा मिनिटाने, त्याने त्याच्या मालकासाठी वाफाळता कप आणला. पायरोने त्या त्रासदायक वाफा आनंदाने हुंगल्या. त्याने ते पेय घोट घोट घेतल्यावर तो स्वतःशीच बोलला, “जगभर बुद्धिबळ वेगळे असते. कोल्ह्याला पकडायला, कुत्र्यांबरोबर फार वेगाने स्वार व्हावे लागते. तुम्ही ओरडता, धावता, तो वेगाचा प्रश्न असतो. मी स्वतःहून हरिणावर नेम साधलेला नाही, पण मला समजले आहे, की असे करण्यासाठी तुम्हाला खूप खूप काळ श्रम करावे लागतात. माझा मित्र हेस्टीग्ज याने हे प्रकरण माझ्याकडे सोपवले आहे. जॉर्ज, आपली इथली पद्धत यापैकी कुठलीच नको. आपण घरच्या मांजराबद्दल विचार करून बघू. खूप तास श्रम केल्यावर, ते आता उंदराच्या बिळाकडे लक्ष ठेऊन आहे. ते हालचाल करत

नाही आहे. ते त्याचे श्रम फुकट घालवत नाही आहे. पण --- ते निघूनही जात नाही.”

त्याने सुस्कारा टाकून, रिकामा कप त्याच्या बशीत ठेऊन दिला.

“मी तुला काही दिवसांकरता सामान आणून ठेवायला सांगतो. जॉर्ज, तू उद्या लंडनला जा व पंधरा दिवसाकरता लागणारे सामान आण.”

जॉर्ज नेहमीप्रमाणे काही भावनाप्रदर्शन करता, बोलला, “ठीक आहे, सर.”

अलीकडील पायरोचे मॉन रेपोस येथील वास्तव्य खूप लोकांची शांती घालवत होते. व्हिक्टर ॲस्टवेलने त्याच्या वहिनीकडे रागाने तक्रार केली होती. “नॅन्सी, हे लोक कसे असतात, तुला माहिती नाही. त्याला इथे आनंदाने आरामात रहायला मिळते आहे. तो इथे महीनाभरसुद्धा राहील आणि तुला रोज अनेक गिनीज खर्च करायला लावेल.”

यावर ॲस्टवेल बाईसाहेबांचे उत्तर होते, की ती काय ते बघून घेईल. तिच्या कामात कुणी ढवळाढवळ करू नये.

लिली मार्ग्रेव्हने प्रामाणिकपणे तिची अस्वस्थता लपवली. एके वेळी तिला वाटले होते, की पायरोने तिच्या गोष्टीवर विश्वास ठेवला. आता तिची तेवढी खात्री नव्हती.

पायरोने पूर्णपणे कृतिशीलता न दाखवण्याचा खेळ खेळला नव्हता. त्याच्या तात्पुरते तिथे रहाण्याच्या पाचव्या दिवशी, त्याने जेवणाच्या वेळी एक अंगठ्यांचे ठसे घ्यायचे उपकरण आणले. प्रत्येकाची विशिष्ट ओळख म्हणून त्याचा उपयोग होता. ते जरा विचित्र उपकरण होते. कारण कोणीच

त्यांचे अंगठ्याचे ठसे द्यायला नकार द्यायला धजत नव्हते. तो छोटा माणूस झोपायला गेल्यावरच व्हिक्टरने त्याचा दृष्टीकोन प्रकट केला.

“तुम्हाला याचा अर्थ कळतो आहे का? नॅन्सी, आपल्यापैकी एकाच्या तो मागे आहे.”

“व्हिक्टर, काहीतरीच बोलू नकोस.”

“ठीक आहे. मग त्याच्या त्या मिचमिच्या लहानशा पुस्तकाचा दुसरा काय अर्थ काय आहे?”

ॲस्टवेल बाईसाहेब स्वसमाधानाने ओवेन ट्रेफुसीसकडे अर्थपूर्णतेने बघत बोलल्या, “मिस्टर पायरो काय करत आहेत, ते त्यांना माहिती आहे.”

एका दुसऱ्या प्रसंगी, पायरोने पाऊलाचा ठसा कागदावर घेण्याचा एक नवीनच खेळ सुचवला. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच्या मांजरासारख्या मऊ दबक्या पाऊलांनी तो वाचनालयात गेला. तिथे असलेला ओवेन ट्रेफुसीस दचकला व जणू त्याच्यावर गोळी झाडल्यासारखा खुर्चीतून उडी मारून उठला.

तो कडकपणे म्हणाला, “तुम्ही मला खरच माफ केले पाहिजे. पण तुम्ही आमच्यावर चाल करून आला आहात.”

छोटा माणूस निरागसपणे बोलला, “खरे की काय? ते कसे?”

सचिव म्हणाला, “मी कबूल करेन, की ही केस चार्ल्स लिव्हरसनविरुद्ध ठामपणे जात चालली आहे. पण तुम्हाला तसे वाटत नसल्याचे दिसते आहे.”

पायरो खिडकीतून बाहेर बघत उभा होता. तो एकदम ट्रेफुसीसकडे वळला.

“मिस्टर ट्रेफुसीस, मी तुम्हाला विश्वासात घेऊन, काही सांगतो.”

“सांगा, ते काय आहे?”

पायरोला सुरवात करायची काही घाई नसल्याचे दिसले. तो कां कू करत, मिनिटभर थांबला. जेव्हा बोलला, तेव्हा सुरवातीचे शब्द उघडणाऱ्या व मिटणाऱ्या दारासारखे होते. विश्वासात घेऊन, काही सांगण्याऐवजी त्याचा आवाज जरा मोठा होता. तो बाहेरील हॉलमधून येणाऱ्या पायरवामध्ये बुडालेला होता.

“मिस्टर ट्रेफुसीस, मी तुम्हाला विश्वासात घेऊन, काही सांगतो. नवीन पुरावा सापडला आहे. त्या रात्री जेव्हा चार्ल्स लिव्हरसन मनोऱ्याच्या खोलीत शिरला, तेव्हा सर रुबेन आधीच मरण पावलेले होते.”

सचिव त्याच्याकडे रोखून बघू लागला.

“पण पुरावा काय आहे? आम्ही याविषयी काही ऐकले कसे नाही?

छोटा माणूस चमत्कारिकपणे बोलला, “तुम्ही ऐकाल, पण मध्यंतरीच्या काळात फक्त तुम्हाला आणि मलाच हे गुपित माहिती आहे.”

तो चपळपणे खोलीबाहेर पडला आणि हॉलबाहेरील व्हिक्टर ॲस्टवेलवर जवळजवळ आदळला.

“मिस्टर, तुम्ही आत येत होतात का?”

ॲस्टवेलने मान हलवली. तो जोराने श्वास घेत बोलला, “बाहेर भयानक दिवस आहे. गार आणि वारा सुटलेला!”

पायरो म्हणाला, “ओहो, मी आज चालायला जाणार नाही --- मी --- एखाद्या मांजरासारखा आहे. मी शेकोटीशी बसून राहीन आणि उब मिळवेन.”

पायरो हात चोळत, त्याच्या विश्वासू नोकराला म्हणाला, “जॉर्ज, ते खरे आहे. ते वाळत घातलेल्या कपड्यांसारखे --- उडी मारायच्या तयारीत आहेत. ते अवघड आहे. जॉर्ज, मांजराचा खेळ खेळणे --- दबा धरून बसणे, पण त्याने नवलपूर्ण उत्तर मिळेल. उद्या आपण पुढील परिणाम बघू.”

दुसऱ्या दिवशी, ट्रेफुसीसला गावाला जावे लागले. व्हिक्टर ॲस्टवेल गेला, त्याच त्याच गाडीने तो गेला. त्यांनी घर सोडल्याबरोबर, पायरो झपाट्याने कामाला लागला.

“जॉर्ज, चल आपण घाईने कामाला लागू. जर नोकराणी या खोल्यांमध्ये आली, तर तिला तू थांबवून ठेव. तिच्याशी गोडगोड बोलत रहा. तिला पॅसेजमध्येच ठेव. आत येऊ देऊ नकोस.”

पहिल्यांदा तो सचिवाच्या खोलीशी गेला आणि नीटपणे शोधायला सुरवात केली. एखादाही खण किंवा मांडण तपासायची राहिली नाही. मग त्याने घाईने परत सर्व होते तसे लावले आणि त्याचे इथले काम संपले असल्याचे जाहीर केले. दारावर राखण करणाऱ्या जॉर्जने खुणेचा खोकला काढला.

“सर, तुम्ही मला माफ कराल?”

“काय रे जॉर्ज?”

“सर, बूट. मांडणीच्या दुसऱ्या कप्प्यात तपकिरी चामड्याच्या बुटांच्या दोन जोड्या होत्या आणि चांगल्यापैकी मांडणीच्या खाली होत्या. त्या बदलून तुम्ही त्यांचा क्रम बदलला आहे.”

त्याचे हात धरत पायरो ओरडला, ”छान! पण त्यामुळे आपण खेद प्रकट करायला नको. ते फार महत्वाचे नाही. मी तुला खात्री देतो जॉर्ज, मिस्टर ट्रेफुसीसचे इतक्या क्षुल्लक गोष्टीकडे लक्षही जाणार नाही.”

जॉर्ज म्हणाला, “सर, तुम्ही जसा विचार करता, तसे.”

पायरो त्याला उत्तेजन देत, खांद्यावर थोपटत बोलला, “अशा गोष्टींकडे लक्ष जाणे, हे तुझे काम आहे. त्यामुळे, तू विचार करतोस, हे सिद्ध होते.”

नोकराने काही उत्तर दिले नाही. त्यानंतर त्या दिवसात हेच काम व्हिक्टरच्या खोलीत केले गेले. व्हिक्टरचे आतले कपडे खणांमध्ये जागच्या जागी शिस्तीने ठेवलेले नव्हते, यावर त्याने काही भाष्य केले नाही. पण दुसऱ्या केसमध्ये निदान अशा घटना घडल्या, की पायरो चुकीचा व नोकर बरोबर ठरला. त्या संध्याकाळी व्हिक्टर तावातावाने हॉलमध्ये आला.

“ए छोट्या, खोडकर बेल्जियन भिकारड्या, तू माझ्या खोलीत काय शोधत होतास? काय रे मूर्खा, तुला तिथे काय सापडेल, असे वाटत होते? माझ्याकडे ते नाही, समजले? घरात बसलेला ससाशोधकासारखा लहानसा हेर कुठला!

त्याचे वाक्ताडन चालू असताना, पायरोने त्याचे हात पसरले. त्याने शंभरदा, हजारदा माफी मागितली. तो गोंधळला होता. क्षुल्लक गोष्टी खात्रीपूर्वक सांगत होता. त्याने जादा स्वातंत्र्य घेतले होते. शेवटी, रागाचा पारा चढलेला माणूस सक्ती केल्यासारखा शांत झाला. पण तरी तो गुरगुरतच होता.

त्या संध्याकाळी परत त्याच्या हर्बल पेयाचे घुटके घेत, पायरो जॉर्जला बोलला, "ते पुढे चालले आहे. जॉर्ज, ते प्रकरण पुढे चालले आहे."

हर्क्युल पायरोने विचार केला, " शुक्रवार हा माझ्या चांगल्या नशीबाचा दिवस आहे."

"खरे आहे, सर."

"पण जॉर्ज, तू कदाचित अंधश्रद्ध नाहीस?"

"मी कमनशिबी असणे निवडत नाही. मी फसवेगिरीच्या विरोधात आहे. सर, माझ्या मनात शुक्रवारबद्दल काही अंधश्रद्धा नाहीत."

पायरो म्हणाला, "ते चांगले आहे. आज आपण वॉटरलूला जाऊ, मग भेटू."

"हो, सर."

"तुला इतका उत्साह आहे. प्रिय जॉर्ज, तू मला हेदेखील विचारत नाहीस, की माझ्या मनात काय योजना आहेत?"

"त्या काय आहेत, सर?"

"जॉर्ज, मी आज मनोऱ्याच्या खोलीची नीट तपासणी करणार आहे."

ठरल्याप्रमाणे, न्याहारीनंतर पायरो ॲस्टवेल बाईसाहेबांच्या परवानगीने गुन्ह्याच्या ठिकाणी गेला. सकाळच्या वेगवेगळ्या वेळी, घरातील मंडळींनी त्याला जमिनीवर रांगून चारी कोपरे, मखमलचे पडदे व भिंतीवरील तसबिरी उंच चढून बारकाईने तपासतांना पाहिले. ॲस्टवेल बाईसाहेबांना पहिल्यांदाच अस्वस्थ वाटले.

त्या म्हणाल्या, “मला कबूल केले पाहिजे, शेवटी मलाही त्याचा राग येऊ लागला आहे. त्याच्या मनात काय आहे, ते कळत नाही. त्याला कुत्र्यासारखे जमीन हुंगत फिरतांना, बघून माझ्या अंगावर काटाच आला. तो काय शोधत आहे, ते मला समजले पाहिजे. माझ्या प्रिय लिली, तू वर जाऊन काय चालले आहे, ते बघावेस, असे मला वाटते. नाहीतर नको, तू इथे माझ्याजवळ राहिलेले बरे.”

सचिवाने उठून विचारले, “मी जाऊ का?”

“जर तुम्ही जाऊ शकत असलात तर जा, मिस्टर ट्रेफुसीस.”

ओवेन ट्रेफुसीस खोलीतून निघाला व मनोऱ्याच्या खोलीचा जिना चढू लागला. पहिल्या नजरेत त्याला वाटले, की खोली रिकामी आहे. तिथे पायरो नव्हता. तो पुन्हा खाली उतरत होता, तेव्हा एक आवाज त्याच्या कानावर पडला. मग त्याने अर्ध्या गोल जिन्यावर वरती झोपायच्या खोलीकडे जाणाऱ्या छोट्या माणसाला पाहिले. त्याच्या डाव्या हातात भिंग होते आणि त्याने तो जिन्यावरील गालिच्याच्या बाजूला असलेल्या लाकूडकामाचे निरीक्षण करत होता.

सचिव त्याच्याकडे बघत असतांना, अचानक तो काही गुरगुरला व भिंग खिशात टाकले. बोट व अंगठ्यामध्ये काही धरून, तो उठला. त्यावेळेस त्याला सचिवाची चाहूल लागली.

“ओहो, मिस्टर ट्रेफुसीस, तुम्ही इथे आलेले मी पाहिले नाही.”

त्या क्षणी तो वेगळा माणूस होता. त्याच्या चेहऱ्यावर विजयाचा आनंद दिसत होता. ट्रेफुसीसने त्याच्याकडे आश्चर्याने पाहिले.

“मिस्टर पायरो, काय झाले? तुम्ही फार आनंदी दिसता आहात.”

छोट्या माणसाने त्याची छाती फुगवली.

“हो, ते खरे आहे. मी सुरवातीपासून जे शोधत होतो, ते मला शेवटी सापडले. गुन्हेगाराला पकडण्यासाठी जे गरजेचे होते, ते मी माझ्या हाताच्या चिमटीत धरले आहे.”

सचिवाने त्याच्या भुवया ताणत विचारले, “तो चार्ल्स लिव्हरसन नाही का?”

पायरो म्हणाला, “तो चार्ल्स लिव्हरसन नाही. या क्षणापर्यंत मला जरी गुन्हेगार माहिती होता, तरी मला त्याच्या नावाबद्दल खात्री नव्हती. पण शेवटी सगळे स्पष्ट झाले आहे.

त्याने जिना उतरला व सचिवाच्या खांद्यावर थोपटले.

“मला ताबडतोब लंडनला गेले पाहिजे. तसे ॲस्टवेल बाईसाहेबांना सांगा. तुम्ही त्याना असे सांगा, की सगळ्यांनी आज संध्याकाळी नऊ वाजता मनोऱ्याच्या खोलीत जमा. मी तिथे असेन. आणि मी खरे काय ते सांगेन. आहा, माझे समाधान झाले आहे.”

आणि लहानसा नाच करत, तो मनोऱ्याच्या खोलीतून निघाला. ट्रेफुसीस त्याच्याकडे बघतच राहिला.

काही मिनिटांने पायरो वाचनालयात आला. कुणी त्याला एक खोका देऊ शकेल का असे तो विचारत होता. त्याने स्पष्ट केले, “दुर्दैवाने माझ्याकडे तशी वस्तु नाही. आणि काही फार किंमतीचे मला त्यात ठेवायचे आहे.”

टेबलाच्या एका खणातून ट्रेफुसीसने त्याला लहान खोका काढून दिला. त्यामुळे पायरो खूप आनंदित झाला.

त्याच्या शोधाचा खजिना घेऊन, तो घाईने वरती गेला. वाटेत त्याला जॉर्ज भेटला. त्याच्याकडे पायरोने खोका दिला. त्याने स्पष्ट केले, “यात काही महत्वाचे आहे. प्रिय जॉर्ज, माझ्या ड्रेसिंग टेबलाच्या दुसऱ्या खणात माझ्या मोत्यांचे मोठे नेकलेस असलेल्या हिऱ्याच्या केसशेजारी हे ठेव.”

जॉर्ज म्हणाला, “ठीक आहे, सर.”

ते मोडू नकोस. काळजी घे. त्या खोक्यात असे काही आहे, की ज्यामुळे गुन्हेगार फाशी जाईल.”

जॉर्ज म्हणाला, “सर, काही काळजी करू नका.”

पायरो घाईने जिना उतरला व त्याची टोपी हातात घेऊन धावत घराबाहेर पडला.

त्याचे परतणे भपकेबाज नसून, शांत होते. विश्वासू जॉर्जने त्याच्या आज्ञेप्रमाणे कडेचे दार उघडून, त्याला आत घेतले.

पायरोने विचारले, “ते सर्वजण मनोऱ्याच्या खोलीत जमले का?

“हो, सर.”

काही शब्द पुटपुटले गेले आणि मग पायरो विजयाच्या धुंदीत पायऱ्या चढून, महिन्यापेक्षा कमी दिवसांपूर्वी खून झालेल्या खोलीत शिरला. त्याचे डोळे खोलीभर फिरले. ते सगळे तिथे होते. ॲस्टवेल बाईसाहेब, व्हिक्टर ॲस्टवेल, लिली मार्ग्रेव्ह, सचिव आणि स्वयंपाकी, पार्सन्स. स्वयंपाकी दाराशी अनिश्चिततेने घुटमळत होता.

पायरो तिथे आल्यावर, पार्सन्स म्हणाला, “सर, माझी इथे गरज आहे का? हे बरोबर दिसेल का, मला माहिती नाही.”

“अगदी बरोबर दिसेल. मी तुला विनंती करतो, इथेच रहा.”

तो खोलीच्या मध्यभागी सरकला.

तो सावकाश, विचारपूर्वक बोलला, “ही खूप रुची असलेली केस आहे, कारण सर रुबेन अॅस्टवेलचा खून कोणीही करू शकत होते. त्याचा पैसा वारसाहक्काने कुणाकडे जाणार आहे? तर चार्ल्स लिव्हरसन आणि अॅस्टवेल बाईसाहेब. त्याच्याजवळ त्या रात्री कोण होते? तर अॅस्टवेल बाईसाहेब. त्याच्याबरोबर आक्रमकपणे कोण भांडले? तर परत अॅस्टवेल बाईसाहेब.”

अॅस्टवेल बाईसाहेब ओरडल्या, “तुम्ही काय बोलता आहात? मला समजत नाही, मी --- “

पायरोने गंभीरपणे व विचारपूर्वक चालू ठेवले, “पण दुसरे कुणीतरी सर रुबेनशी भांडले. दुसरे कुणीतरी त्या रात्री रागारागाने त्याला सोडून बाहेर पडले. समजा अॅस्टवेल बाईसाहेब पावणेबारा वाजता त्यांच्या नवऱ्याला खोलीत जिवंत सोडून बाहेर पडल्या, तर ते चार्ल्स लिव्हरसन परतण्यापूर्वी दहा मिनिटे असावे. त्या दहा मिनिटात, दुसऱ्या मजल्यावरून कुणाला तरी येऊन खुनाचे कृत्य करणे, व परत त्याच्या खोलीत जाणे शक्य होते.”

व्हिक्टर अॅस्टवेल ओरडत उभा राहिला. रागाने घसा दाटत, तो ओरडला, “काय मूर्खपणा आहे --- ?”

“रागाच्या भरात, मिस्टर व्हिक्टर अॅस्टवेल, एकदा तुम्ही पश्चिम आफ्रिकेतील एका माणसाला ठार मारलेत.”

लिली मार्ग्रेव्ह ओरडली, “माझा यावर विश्वास नाही.”

हात गुंफलेले व गालांवर दोन चमकते रंगीत डाग घेऊन, ती पुढे आली. ती परत म्हणाली, “माझा यावर विश्वास नाही.” ती व्हिक्टर ॲस्टवेलच्या बाजूला आली.

व्हिक्टर ॲस्टवेल बोलला, “लिली, हे खरे आहे. पण या माणसाला माहिती नसलेल्या काही गोष्टी आहेत. मी ज्याला मारले, तो जादूटोणा करून रोग बरे करणारा होता. त्याने निर्दयपणे पंधरा मुलांचे खून केले होते. मी समजतो, की मी त्यांना न्याय दिला.”

लिली पायरोकडे आली. ती कळकळीने म्हणाली, “तुम्ही चुकत आहात. कारण तो माणूस लगेच चिडणारा होता, त्याचे भान सुटून, तो काही बरळायचा. पण ते काही त्याला मारायचे कारण होऊ शकत नाही. मला माहिती आहे --- मला माहिती आहे, मी तुम्हाला सांगते --- की मिस्टर ॲस्टवेलला असे करणे शक्य नाही.”

पायरोने मोठ्या चौकसपणे हसून, तिच्याकडे पाहिले. मग त्याने तिचा हात हातात घेतला व हळूहळू त्यावर थोपटले. “असे बघा, तुम्हालाही काही अंतर्ज्ञानाने, मिस्टर ॲस्टवेलबद्दल विश्वास वाटत असेल, बरोबर ना?”

लिली शांतपणे बोलली, “मिस्टर ॲस्टवेल एक चांगाला माणूस आहेत. ते प्रामाणिक आहेत. त्याना मपला गोल्ड फिल्डच्या आतल्या कामाबद्दल काही माहिती नाही. ते पूर्णपणे चांगले आहेत --- मी त्यांना लग्नाचे वचन दिले आहे.”

व्हिक्टर ॲस्टवेल तिच्या बाजूला आला व त्याने तिचा दुसरा हात हातात घेतला. “मिस्टर पायरो, देवासमोर मी सांगतो, मी माझ्या भावाला मारले नाही.”

पायरो म्हणाला, “ते मला माहिती आहे.”

त्याचे डोळे खोलीभर फिरले. “माझ्या मित्रांनो, ऐका. संमोहनाच्या अंमलाखाली, ॲस्टवेल बाईसाहेबांनी सांगितले, की त्या रात्री या खोलीच्या पडद्यामागे फुगवटा होता.”

प्रत्येकाचे डोळे खिडकीकडे वळले.

व्हिक्टर ॲस्टवेल उद्गारला, “म्हणजे तुम्हाला म्हणायचे आहे, की पडद्यामागे चोर लपला होता? वा! वा! प्रश्नाची काय पण उकल आहे!

पायरो शांतपणे बोलला, “आहा, पण तो तो पडदा नव्हता.”

तो वळला आणि लहानशा जिन्याला वेढणाऱ्या पडद्याकडे निर्देश केला.

“सर रुबेन यांनी खुनाच्या आदल्या रात्री ती झोपायची खोली वापरली होती. त्यांनी न्याहारीदेखील तिथेच घेतली. मिस्टर ट्रेफुसीसला सूचना देण्यासाठी त्यांनी तिथेच बोलावले. मला माहिती नाही, की मिस्टर ट्रेफुसीसने तिथे काय मागे ठेवले, पण काहीतरी तिथे होते. जेव्हा त्यांनी सर रुबेन व ॲस्टवेल बाईसाहेब यांना शुभ रात्र म्हटले व तो गेला, त्यानंतर त्याला ती विसरलेली वस्तु आठवली. ती घेण्यासाठी तो धावत जिना चढला. मला नाही वाटत, की नवराबायकोपैकी कुणी त्याला पाहिले. कारण त्यांचा आक्रमक वाद आधीच सुरु झाला होता. मिस्टर ट्रेफुसीस पुन्हा जिना उतरू लागला, तेव्हा त्यांचे भांडण चालू होते.

ते ज्या गोष्टी एकमेकांना बोलत होते, त्या खासगी व व्यक्तिगत स्वरूपाच्या होत्या. मिस्टर ट्रेफुसीसना त्यामुळे फारच लाजल्यासारखे झाले. त्याला समजले, की त्याना असे वाटत होते, की तो मगाशीच तेथून गेला. त्याच्याविषयीचा सर रुबेन यांचा राग वाढू नये म्हणून तो तिथेच थांबला व नंतर सटकला. तो तिथे पडद्यामागे उभा राहिला. ॲस्टवेल बाईसाहेब खोलीबाहेर पडल्या, तेव्हा त्यांच्या नेणीवेत पडद्यामागील त्याची आकृती ठसली.

जेव्हा ॲस्टवेल बाईसाहेब खोलीबाहेर पडल्या, तेव्हा ट्रेफुसीस कोणी न बघता बाहेर पडायच्या प्रयत्नात होता. पण सर रुबेनने डोके वळवल्यामुळे, त्याना तो तिथे असल्याचे समजले. आधीच ते चिडलेले होते. त्यांनी सचिवावर मुद्दाम चोरून संभाषण ऐकल्याचा व हेरगिरीचा आरोप करत शिव्यांचा वर्षाव करायला सुरवात केली.

‘‘स्त्रीपुरुष हो, मी मानसशास्त्राचा विद्यार्थी आहे. या सबंध केसभर मी वाईट स्वभावाचा पुरुष वा बाई पाहिली नाही, कारण वाईट स्वभाव हा स्वतःच्या सुरक्षिततेची वाफ बाहेर पडणारे भोक असते. जो भुंकून मोकळा होतो, तो चावत नाही. नाही. जो मनुष्य शांत आहे व ज्याचा स्वतःवर ताबा आहे, ज्याने नऊ वर्षे वादामध्ये हरण्याचे काम केले आहे, असा मनुष्य स्वभावाने चांगलाच आहे. पण एवढी वर्षे सहन केलेला ताण फार होता. हळूहळू साचत गेलेल्या रागामुळे पश्चात्तापाची भावना नव्हती.

नऊ वर्ष सर रुबेन त्याच्या सचिवाला धमक्या देऊन त्याचा अपमान करत होता. नऊ वर्षे सचिवाने शांतपणे सगळे सहन केले होते. पण एक दिवस असा येतो, की ताण तुटायला येऊन ठेपतो. शेवटी काहीतरी तुटते! ती ती रात्र होती. सर रुबेन परत त्यांच्या टेबलाशी बसले. पण सचिवाने

मुकाट्याने व नम्रपणे दाराकडे वळण्याऐवजी, जड लाकडी सोटा उचलला व सर रुबेनला मागून, मारला. त्याला सतत घालून पाडून बोलणाऱ्या माणसाला कायमचे झोपवले.”

तो ट्रेफुसीसकडे वळला. ट्रेफुसीस त्याच्याकडे पुतळ्यासारखा होऊन, रोखून बघत होता.

‘तुमचा पुरावा खूप साधा होता. मिस्टर ॲस्टवेलना वाटले, तुम्ही तुमच्या खोलीत आहात, पण कोणीच तुम्हाला तिकडे जातांना पाहिले नव्हते. सर रुबेनला ठार मारल्यावर, तुम्ही नुकतेच बाहेर पडत होतात, तेव्हा तुम्ही एक आवाज ऐकला. मग तुम्ही घाईने पडद्यामागे लपलात. चार्ल्स लिव्हरसन खोलीत शिरला, तेव्हा तुम्ही तिथे पडद्यामागे होतात. लिली मार्ग्रेव्ह आली, तेव्हाही तुम्ही तिथेच होतात.त्यानंतर बऱ्याच वेळाने तुम्ही शांतपणे तुमच्या झोपायच्या खोलीत गेलात. हे तुम्ही मान्य करता का?”

ट्रेफुसीस अडखळू लागला. “मी --- मी कधीच --- “

“आहा! आपण हे संपवून टाकू. गेले दोन आठवडे मी हे प्रहसन खेळतो आहे. मी तुमच्याभोवती हळूहळू पाश आवळत आणला आहे. हाताचे व पायाचे ठसे, तुमच्या खोलीची झडती, त्यातील कलात्मकतेने बदललेल्या वस्तु. या सर्वांमुळे, मी तुमच्यात भीती निर्माण केली. तुम्ही त्या रात्री जागे राहिलात. तुम्हाला नवल वाटत होते व भीतीही वाटत होती, की खोलीत कुठे बोटांचे ठसे किंवा इतर कुठे पायाचे ठसे राहिले तर नाहीत ना?

पुन्हा पुन्हा त्या रात्रीतील घटनासाखळी तुम्ही आठवून बघत होतात. काय केले आणि काय करायचे राहिले, याबद्द्ल नवल करत होतात. त्यामुळे मी तुम्हाला अशा जागी आणले, जिथे तुम्ही चूक केलीत. तुम्ही

जिन्यात रात्री जिथे लपून उभे होतात, तिथून, जिन्यातून मी काही उचलून घेतले. तेव्हा मी आज तुमच्या डोळ्यात भीती पाहिली. मग मी मोठा शोध घेऊन, लहानसे खोके जॉर्जकडे दिले. म्हणून मी आता बाहेर जातो.”

पायरो दाराकडे वळला. “जॉर्ज?”

“मी इकडे आहे, सर.” नोकर पुढे आला.

“तू या स्त्रीपुरुषांना सांगशील का, मी तुला काय सूचना दिल्या होत्या?”

“सर, आज दुपारी साडेतीन वाजता, मला खोके जिथे ठेवायला सांगितले होते तिथे ठेऊन, मला तुमच्या कपडेपटात लपून रहायला सांगितले होते.

मिस्टर ट्रेफुसीस खोलीत शिरला, तेव्हा तो खणाशी गेला आणि ते खोके बाहेर काढले.”

पायरो पुढे म्हणाला, “त्या खोक्यात एक सर्वसाधारण पिन होती. मी नेहमी खरे बोलतो. आज सकाळी मी जिन्यावरून काहीतरी उचलले. ती तुझी इंग्लिश म्हण होती, नाही का? ‘पिन बघा, ती उचला व दिवसभर तुमचे नशीब चांगले ठरेल.’ माझे नशीब चांगले होते. मला खुनी सापडला.”

तो सचिवाकडे वळला. तो सभ्यपणे बोलला, “तू तुला फसवलेस.”

अचानक ट्रेफुसीस मोडून पडला. तो चेहरा हातात लपवून, हुंदके देत, मटकन खुर्चीत बसला. तो बोलला, “मी वेडा झालो होतो. मी वेडा झालो होतो. पण देवा रे, पण त्याने मला मर्यादेबाहेर व असह्य रीतीने वाईट वागवले होते. छळले होते. खूप वर्षे तो राग माझ्या मनात साठून राहिलेला होता. मग मी त्याला खलास केले.”

ॲस्टवेल बाईसाहेब ओरडल्या, मला हे माहिती होते.”

तिने पुढे उडी मारली. रानटी विजयाने, तिचा चेहरा पूर्णपणे बदलला.

“मला माहिती होते, या माणसाने ते केले आहे.”

ती तिथे विजयाने रानटीपणे उभी राहिली.

पायरो म्हणाला, “आणि तुमचे बरोबर होते. एखादा गोष्टींना वेगळे नाव देऊ शकतो, पण घडले ते घडलेलेच रहाते. ॲस्टवेल बाईसाहेब, तुमचे अंतर्मन तुम्हाला जे सांगत होते, ते बरोबर निघाले. मी तुमचे अभिनंदन करतो.”

***समाप्त***

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे छत्तीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*













ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


Agatha Christrie


डॉ. वृषाली जोशी यां

























## डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)










वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२



वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE



सॉमरसेट मॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
short story by W. Somerset Maugham
BEFORE
THE PARTY



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE
STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night






शेरलॉक होम्स
भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक
कराल ते पुस्तक उघडेल








## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.
## डॉ. वृषाली जोशी यांचे हे छत्तिसावे पुस्तक.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३८),

अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३५), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२२), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(९), श्याम कुलकर्णी(८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(३), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(२), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन

लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।